म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
संग्रहालय क्रमांक
१५९२
लेखक
पुस्तकाचें नांव
सन

नं. ..................
ता. ..................

# फरडा मुत्सद्दी

( प्रहसन. )

हें

नारायण हरि भागवत

यांनीं

मुंबईत

"जगदीश्वर" छापखान्यांत छापविलें

सन १८८५

किंमत तीन आणे.

# फरडा मुत्सद्दी प्रहसन.

## प्रवेश १ ला.

स्थळ—बाजारांतील दुकान.

पात्रें—तिमाजी नाईक, दुकानावर आलेले दोन गृहस्थ, नकल्या, आणि रस्त्यावरील मंडळी.

प०—वाटेनें आपल्या जवळ ज्या दुकानाची तारिफ करीत होतों तें हेंच दुकान.

दु०—हेंच का तिमाजीनाईकाचें दुकान ? हें तर अगदीं लहान दिसतें!

प०—लहान तर खरेंच, पण आज कुणि एक कोटि रुपयांचा माल खरेदी करूं ह्मटलें, तर नाईक जागचे हल्ल्यावांचून माल काढून देतील.

दु—हंहं:—असें असून या दुकानाचा भपका तर कांहीं दिसत नाहीं !

प०—दुकानाचा वरकांति भपका या ठिकाणीं कांहीं नाहीं, पण काय जो भपका आहे, तो नुस्त्या सचोटीचा—आणि तो उभ्या बाजारांत पाहूं गेलें तर कुठेंहि मिळणार नाहीं !

दु०—असें आं—तर चला त्याच दुकानांत आपण माल खरेदी करूं.

प०—चला, नाईकहि पण दुकानावर आलेले दिसतात.

दु०—काय हो, तो ब्राह्मण चर्येवरून मोठा कर्मशील दिसतो !

प—कर्मशील ह्मणजे काय विचारता ! एखादे दिवशीं अरुणोदय संभ्रमानें सूर्यनारायणास प्रभातकाल संधीचा विसर पडेल, पण नाईकांचें इकडे गंगाभागिर्थी सरस्वतीचें स्मरण आणि तिकडे तोफेची सरबत्ती—बरोबर! तेव्हां पासून ही वेळ पर्यंत संध्या, जप, पूजा, आणि इतकें उतार वय झालें असताहि कधीं नमस्कार ह्मणून चुकायचे ! अंहं:!

दु०—एकूण तेंच तर त्याच्या अंगावर तेज दिसतें!

प०—तेज ह्मणजे काय ! नाहीं त्याच्या डोकीला छपरीदार पागोटें, पहालेत ना, आपलें थालिपिठी; नाहीं त्याचा महिरपदार संजाव, पहा

शेंडीचा केस एक तरी बाहेर दिसतो का? नाहीं त्याच्या फुल्लेदार मिशा, आपल्या साध्या; पण हजार मंडळींत असूं द्या पहिल्यानें पाहिली ती नजर आपली त्याकडेसच जायची !

दु०—आज चार दिवस तुमच्या या वड्या शहरांत फिरतों, पण एकहि मनुष्य चेहेऱ्यांत देखील पाणीदार दिसत नाहीं !

प०—अहो कशाचा पाणीदार घेऊन बसला आहांत! त्या बाईनें जो तडाका मारला त्यानें आमच्या या मंडळीला निपाणी करून निव्वळ पिपाणी करून सोडलें आहे ! चेहेरेच तुह्मांला पहायचे—तर कुणी पुढें आलेल्या डोळ्यांचे, कुणि फुदरलेल्या नाकांचे, कुणि अगडबंब काळेदेव, कुणि फेअरसेक्सच्या वळणावर गेलेले, असलेच कांहीं तरी विद्रुप दिसायचे ! पाणीदार असणें कांहीं फुकटचें नसतें, त्याला अंगांत कांहीं राम असावा लागतो !

दु०—मग तो राम आतां कुणिकडे गेला ?

प०—अहो अधर्मांत राम रहातो कशाला ! तो गेला यानां सोडून !

दु०—असा काय बुवा येथें अधर्म चालला आहे ?

प०—तो गोंधळ ऐकून तुमचे पवित्र कान न विटाळोत !

दु०—त्याचा थोडासा मासला तर आह्मांला कळूं द्या.

प०—आणखी दुसरा कसला नाहीं—फक्त देशसुधारणुकेचा !

दु०—मग त्यांत अधर्म प्रवर्तक कांहीं प्रकार नसावेत !

प०—देशाचीच सुधारणा करण्या करितां अधर्म प्रवर्तक पापसंचय करणारे जरी त्यांत प्रकार उत्पन्न झाले, तथापि न्यायदेवता ते दोषास पात्र धरित नाहीं!

दु०—हीं गटारें, या सडका, ते रस्ते—खडी टाकून चेपून चापून रोळ फिरवून तयार करण्यांत कांहीं अधर्म नाहीं !

प०—अहो सडकावरच काय, तो तर आतां सर्वांवरच फिरूं लागला आहे! पण ते खुशाल गटारांत पाहिजे तर लोळूं द्या, पाहिजे तर रस्ते झाडूं द्या—कोणाला कांहीं त्यांच्याजवळ करायचें नाहीं !

दु०—मग गोंधळ तो कशाचा आहे ?

प०—येथेंच तर काय ती मेख आहे !

दु०—ती मेख कशी काय बुवा ?

प०—अहो, देशाची सुधारणा करण्या करितां हा गोंधळ नसून देशाची

सुधारणा—ह्मणजे "सिव्हिलिझेशन् इन् दि इंटरेस्ट् ऑफ् ह्युम्यानिटि" या नांवावर चालली आहे !

दु०—हें काय तुह्मीं सांगितलें तें कांहीं आपल्याला समजलें नाहीं.

प०—नाहीं समजणार. ते शब्दच तुह्मांला नवशिके आहेत !

दु०—नवशिका प्रकार तर आपल्याला समजून घेतला पाहिजे.

प०—समजून घ्या, पण समजल्यावर तुह्मीं मात्र त्यांत मिसळूं नका.

दु०—अहो आह्मीं पुष्कळ मिसळूं,पण तुमचे फक्कड नागरिक लोक आह्मां गांवढळांस आपल्यांत कशाला मिसळूं देतील !

प०—हं, तेवढें मात्र अगदीं बोलूं नका—त्यांच्या गौडबंगालांत तुमच्याच सारखे लोक पटकन पहिल्यानें सांपडायचे आणि मग रडत बसायचे!

दु०—मग तर तसला अमंगळ प्रकार मला नुसता ऐकायलाहि पण नको!

प०—न ऐकतांच हा सर्व प्रकार तुमच्या सहजच दृष्टीस पडेल !

दु०—आमच्या दृष्टी पडण्याला कारण काय ?

प०—कारण कांहीं नको—ह्या रस्तोरस्तीं रोज उठून तमाशा चालला आहे.

दु०—पण काय हो तुमच्या शहरवासी लोकांची, न्युजांत का कशांतशी मोठ्या मुत्सद्दीपणाची ह्मणतात तारिफ येते ती कशा वरून ?

प०—मुत्सद्दीपण मिळवण्याला मागें फार अवघड होतें—पण अलिकडील शहाणपणांत जो खेळूं लागला, तो पट्टदिशीं मुत्सद्दी बनतो !

दु०—एकूण मुत्सद्दीपण मिळविण्याला हल्लीं कांहींच शहाणपण लागत नाहीं, असा तुमच्या बोलण्याचा झोंक दिसतो ! असेंच कां ?

प०—छे छे छे छे असें कसें होईल महाराज !, शहाणपणांत खेळावें लागतें ना ! तेव्हां तर "फरडा मुत्सद्दी" असा किताब मिळतो ! फुकट नाहीं !

दु०—फरडा मुत्सद्दी ह्मणजे ? हा तर नवीनच शब्द ऐकला !

प०—आतां या शब्दाची व्याख्या सांगत बसत नाहीं, पण—धर बोडकंमा, कीं लाव पाट. घे मूर्ति, कीं दे फेंकून. धर जानवें, कीं तोड ताडदिशीं पहा बाटली; कीं उडीव बूच. फ्याशनेबल् हॉटेल, कीं शीर आंत. परकी, कीं धर पाय. आपला, कीं झोड शिव्या. अशा कृति कराव्या लागतात; तेव्हां फरडेपणा येतो !

दु०—असा जर प्रकार असेल तर शास्त्राचा तो काय मान !

प०—शास्त्र ह्मणजे निवळ शिमग्याचे मंत्र! असें ठरून गेलें आहे!!

दु०—एकूण आतां कांहीं शास्त्र राहिलें नाहीं तर?

प०—त्या ऐवजीं आतां नवीन करार केला आहे!

दु०—शास्त्र ह्मणजे काय—करार?

प०—नाहीं हो! पण शास्त्र हा बीभत्स शब्द पुन्हां उच्चारूं देखील नका!

दु०—शिव शिव, काय मी पाप केलें होतें, तों मी तुमच्या या भ्रष्ट शहरांत आलों!

प०—महाराज आजच आपण असें नका समजूं, कीं हें शहर सगळेंच भ्र[ष्ट] झालें आहे—पण यांतहि कित्येक आज हरीचे लाल असे आहेत, क[ीं] ज्यांनीं उदरपोषण विद्येचा पुष्कळ अभ्यास केला असतांहि, ज्यांन[ा] सुधारणुकेच्या संबंधानें बुद्धिभ्रंश न होतां, जे आपल्याचाच अभिमान धरून सदाचारानें वागत आहेत. ( इतक्यांत दुकानावर जातात. )

ति०—या रावसाहेब, बसा—नाहीं असे आंत येऊन बसा.

दु०—नाईक आपल्या दुकानाची फार तारिफ ऐकतों—पण जागा फार लहान आहे!

ति०—आपल्या व्यापाराला येवढी जागा पुरते—कसें रावसाहेब!

प०—व्यवस्थेशीरपणा, टापटीप, कामापुरती नोकझोंक, यांत कुर्[...] नाइकाची चुक कोणाच्या दृष्टीस पडायची नाहींच!

ति०—अहो ही बाजारची हवा आहे—कळलें का! आपल्याला का[य] पाहिजे?

दु०—कांहीं ९९ आणि कांहीं १०० नंबरी सोनें आणि लहान मोठीं प[ण] उंची मोतीं पाहिजेत. ह्मणतों याच बैठकीस सईसाट माल कर[ून] आणखी काय?

ति०—आणखी नकोच कांहीं बोलायला, मी समजलों आपल्या मनां[त] काय बोलायचें आलें होतें तें. पण आंत बाहेर हात केल्या वांच[ून] आपल्या खुशी प्रमाणें सौदा जमवून दिला ह्मणजे झालें कीं नाहीं—अं:.( मोत्याचे सर पहायला देतो ).

दु०—मोतीं रंगाला पाणीदार असून सुबग घाटाचीं आहेत खरीं, पण—

ति०—पण कां—दुसरीं सांगा. माल माझ्या जवळ तयार आहे.

दु०—मोतीं जीवन पाहिजे.

ति०—हं ! तोहि माल माझ्या जवळ आहे. पण रावसाहेब तुमच्या वांचून जीवन मोतीं मागणारे लोकच फार थोडे !

दु०—का? असें का—हा माल काय लोकांना आवडत नाहीं ?

ति०—असें का आतां कशाचें ? त्या मालाला आतां गिऱ्हाईकच आपल्या देशांत उरलें नाहीं !

दु०—गिऱ्हाईकच उरले नाहीं ह्मणजे ?

ति०—आधीं जीवन मोतीं हें नांवच कोणाला माहीत नाहीं. चुकून एखाद्याला नांव माहीत असलें, तर त्याच्या किमतीचे दाम द्यायला कोणा जवळ पैसा आहे? ( जीवन मोतीं पुढें टाकतो. )

दु०—( पाहून ) हां, हीं मोतीं पाहिजेत. या मालाला गिऱ्हाईक नाहीं ह्मणता, तर हा माल खपतो तरी कुठें ?

ति०—हा माल आतांशा पुष्कळ दिवस विलायतेस जातो, आणि त्याला आतां तेथें गिऱ्हाईक आहे ! तिकडे माल जायची खोटी, कीं फुटाण्या सारखा झर्रकन उडून जातो !

दु०—अहो विलायती लोक सोनें मोतीं वापरीत नाहीं ना ह्मणतात ?

प०—ती आपल्याच लोकांनां अवदसा आठवली आहे. झोड व्याख्यानावर व्याख्यानें, आणि कर उपदेश, कीं आमचे पूर्वज महामूर्ख, त्या वेळ्यांना अक्कलच नव्हती, झाला गाठीं पैसा, कीं घे सोनें, घे मोतीं, आणि ठेव पुरून भुईंत. कशाचा त्यांनीं व्यापार केला, का एखादी गिरणी घातली, का एखादें राजमान्य हॉटेल स्थापन केलें, का स्त्रियांना विद्या शिकविली—काय केलें असें विचारलें तर नाहीं ह्मणायला, यथेच्छ केशरीभात, लाडू, जिलब्या, वगैरे, आसनमांडीचे भले लांबलचक चौके घालून पुरवे झोडले, अशा निंदात्मक गोष्टी विनयाच्या घाटणीवर बोलून देशसुधारकाचा टेंबा मिरवण्या पुढें तुमचे जीवन नि फीवन त्यानां कोठून सुचणार !

ति०—अहो आमचें काय आतां—पहा तर खरें, २९ गेले आणि ९ राहिले ! या सुधारकांची अक्कल ती काय ! घरचे दागीने विकून भांडवल जमवून का व्यापार होतो ! व्यापार चोख अकलेचा रावसाहेब असतो बरें का—आणि फुकाचा नाहीं, पण त्या अकलेला सत्तेचें बळ लागत असते—तेव्हां व्यापार थाटतो !

दु०--खरी गोष्ट आहे—नाईक आपण दोन कारकिर्दी पाहिल्या असतील नाहीं ?

ति०—आं—हें काय ! आणि माझ्या डोळ्यांनीं मी पाहिलें न् हें काय ह्मणावें ! केंशरीभात, लाडू, आणि जिलब्या यांच्या डोळ्यांत सलतात—पण हीं पकान्नें तयार करण्या करितां त्यांना आठ आठ महिने नंगी समशेर हातांत धरून शिर हातावर घेऊन अटके पर्यंत धुम ठोकावी लागत असे, त्याचा कांहीं विचार आहे का यांनां फुकटचे चौके घालून पकान्नें झोडित नव्हते ! पकान्नें झोडायला रक्ताचे पूर वाहवावे लागत असतात—अंग यंव !—कश ची मंडळी घेऊन बसलां हीं—रक्ताचा थेंब पहाण्या बरोबर हे लोक डोळे पांढरे करून बसायचे ! या मंडळीनें दुसऱ्याची तारिफ १६ आणे करावी आणि तिचा मुषाहिरा एका पै चा १९२ वा हिस्सा घ्यावा ! आपल्याला बुवा असला धंदा सावत नाहीं, तेव्हां हें दुकान संभाळून आपण हरि हरि ह्मणत बसलों आहो—कसें !

प०—अहो नाईक, हे हल्लींचे लोक—आह्मीच का घटकाभर ह्मणा. ना—हे उपदेश करण्याचे कामीं मात्र पटाईत—पण कुणि व्यापार करतो ह्मणून जर यांनां सांगितलें, तर पहिल्यानें त्याला असा कांहीं हे नादवतात, कीं बस्स ज्याचें नांव तें ! पण जबरदस्त खटपट करून एखाद्या खप्पीनें एखादी गोष्ट का रंगावर आणलीन, कीं यांनीं तीन तेरा आणि पोबारा करून असें त्याला करून टाकायचें, कीं कुठून त्यानें हें शेण खाल्लें आणि तो यांच्या नादी लागला ! असे कावेबाज लोक हे! कोणाला सांगतील, अरे काहाढ साबणाचा कारखाना आह्मी तुला मदत करतो. कोणाला सांगतील, हूं बघतोस काय, कर छत्र्या. कोणाला सांगतील, हा वेड्या करतोस काय, फुटाण्याचें पोतें खांद्यावर घेऊन गल्लोगल्लीं फिरत विक त्यांत लाज कशाची! हा एक बोलून चालून व्यापार आहे, आणि तो मारवाडी लोक नाहीं करीत ? कोणाला सांगतील, घाल खाणावळ—आमची सरटिफिकिटें देण्यास तयारी; हा धंदा लोक हलका ह्मणतील, पण प्रचारांत येई पर्यंत. आणखी पुष्कळ प्रकारचे पण असलेच चालू असलेले धंदे करण्या विषयीं हे लोक सुचवितात, पण यांत मला असें आश्चर्य वाटतें,

कीं ज्याचा जो धंदा, तो आपला चालेत नाहीं ह्मणून बंद करतो, आणि पोट जाळण्या करितां दाही दिशा भडकत हिंडतो—तसला धंदा हे नवीन उमेदवाराला करायला उपदेश करतात, तेव्हां यांना काय ह्मणावें!

ति०—अहो, काय वेडे आहात तुह्मी! धंदे करून का कुठें राष्ट्र सधन होत असतें! धनसंपन्न राष्ट्र करण्याला हातांत हवी लागते सत्ता—तेव्हां तर व्यापाराचा पगडा बसतो! आह्मी पिढीजादे व्यापारीच आहोंत—ऐकलें का रावसाहेब—या लोकांच्या व्यापाराच्या वडवडी आणि लांब लांब निबंध आह्मी ऐकतों, आणि ते आह्मांला कळतात—पण आह्मांला कळून, आणि त्यांना न कळून, उपयोग सारखाच! मतलबी लोक आपला डाव पुढें फेकण्या करितां ज्या हुला आणतात, त्याच, हें काय ह्मणे अर्थशास्त्र दृष्ट्या यंबनूयंब करून बडबडतात! पण धंद्याच्या अकलेच्या नावानें अंअंच !!! ही पोकळ बडबड कोण ऐकणार!

प०—अहो आहे काय त्यांत, ही देश सुधारण्याचीं व्याख्यानें देऊन नवीन पोरांना हट्ट धरायला शिकवायचे, आणि कांहीं थोडा बहुत संपत्तीचा शेष कुठें उरला असेल, तो विकूनटाकून दारूच्या पायीं विलायतेची भर करायची! ह्मणजे आमचे लोक १९ व्या शतकांत सुधारले! ह्मणजे काय हल्लीची प्रजा सुधारल्याच्या योगानें दारू प्यायला भीत नाहींशी झाली! आणखी काय ह्मणाले, बाप, आजे, पणजे, आणि एकंदर सगळे पूर्वज, यांच्या कुळांचा उद्धार करूं लागले! आणखी काय ह्मणाले, स्त्रीदास्यविमोचन पक्ष उचलून जीवापाड खटपटी करूं लागले !!! ( इतक्यांत नकल्या येतो. )

न०—( सत्यमेव जयते अशीं अक्षरें ज्या निशाणावर फडकताहेत तें खांद्यावर टाकून व बहूरूप्या सारखा वेष करून व दरडावून ) ओहो मिस्तर नाईक, आणि दुसरे लोग हो तुह्मी—तसेंच ऑल् माय् जंटल् मेन् आणि लेडीज्, ऐका, माझी सुखाची गोष्ट तुह्मी ऐका—टुमा लोकांना बाबांनो, बाबांनो स्वर्ग नको असून नर्ककुंडाची इच्छा असेल, नीति सोडून अनीतिवर प्रेम धरायचा असेल, धर्म सोडून अधर्मी व्हायचा असेल, सुख सोडून दुःख व्हावें अशी इच्छा असेल, पौरुषत्व सोडून

नेबलटपणा धारण करायचा असेल, ज्ञान सोडून अज्ञान प्राप्त करून घ्यायचें असेल, तर बाबांनो, आमच्या प्रभूच्या चिरंजीवाचें, आमच्या प्रभूच्या लाडक्या दुतांचें, आमच्या प्रभूच्या मतानें खोट्याला खरेपणा आणून दाखविण्या करितां आपण होऊन तयार झालेल्या फितुरी लोकांचें, प्रत्येक वाक्य तुह्मीं वेदतुल्य माना! त्यांतच तुमचें अकल्याणाचें कल्याण, अधर्माचा धर्म, आणि अनीतीची नीती होईल! ( हें सोंग पाहून दुकानावर गर्दी जमते तिकडे पाहून व निशाणाला झोंका देऊन ) क्या है इदर, ये सब लोग कायके वास्ते इदर मिळा है! ( मंडळींतून एक. )

एक०—( मंडळींतील एकास. ) अरे सोंग कसलें हें! हा तर गांवठी नकल्या!

न०—बाबा लोग, येथें जमून थट्टा करण्याचें काम नाहीं. इटस् आ पोलिटिकल् ऍजिटेशन्! हा देश सुधारला पाहिजे! तुमच्या लोकांनीं अंगाला रंग लावून गांवांत हिंडलें पाहिजे! तुमच्या लोकांनीं खाण्यास रानांतील झाडपाला शिकले पाहिजे! तुमचे जुने लोक सगळे मेले पाहिजेत! तुमचे विचार सगळे बदलले पाहिजेत! तुह्मी जीं दुराचरणें करतां, तीं सगळीं तुमच्या सहधर्मचारिणी भार्या यांस पूर्ण हक्कानें करतां आलीं पाहिजेत! असा जों पर्यंत तुमच्या लोकांत प्रकार होणार नाहीं, तों पर्यंत तुमच्यांत सुधारणा झाली, असें आह्मांस बिलकूल ह्मणतां येणार नाहीं! या करतां बाबा लोग तुह्मी लवकर उमजा!

मं०दु०—भले शाबास गांवठी नकले—खुप बहार केली आज! सोंग तर मोठें मजेदार आणलेत खरें!

(आपल्याला ओळखलें असें पाहून नकल्या हुर्यो करीत पळत जातो आणि त्याच्या पाठोपाठ मंडळीहि जाते. इतक्यांत नाटकाचे दोन तीन प्रुफ दुकानावर टाकून एक मनुष्य जातो. त्यांजपैकीं एक प्रुफ हातांत घेऊन. )

दु०—काय हो बुवा हा छापलेला कागद तो मनुष्य कसला टाकून गेला?

प०—तो नाटकाचा प्रुफ आहे! तींच आतांशा फार बोकाळलीं आहेत!

दु०—( हातांत प्रुफ घेऊन ) हे हे मोतीं ( दाखवून ) आणि ९९ नंबरी शंभर तोळे आणि १०० नंबरी एक शेर वगैरे मालाची टीप आणवून देवबा. ( वाचूं लागण्या पूर्वी ) हा कागद तर मोठा नकशीदार

छापला आहे बुवा ! पण मजकूर काय आहे यांतः– ( वाचतो. ) "अखिलानंद नाटक गृहांत" केवढीं तरी हीं अक्षरं लिहिलीं आहेत! "सत्यप्रिय आर्वाचीन मंडळी" "प्रयोग १ ला आणि शेवटचा" "प्रसंगास योग्य व मुद्दाम तयार केलेला खेळ" "प्राचीन व आर्वाचीन लोक" हें पुढें काय ! तिकिटांचे दर–काय "२ रुपये!"–"१॥!" –"१!"–"-।॥-!"–"-॥-!" "सूचना" काय बुवा ही ! अहो हात काझाडला आहे ! "स्त्रियांस व पुरुषांस जागा व दर एकच ठेविले आहेत!" "विशेष सूचना" "गणपती सरस्वति यांत नसून गांवढळ ताकडथोम अल्लचा व नटी सूत्रधाराचा प्रकार नाहीं !" "गान नाइन्टीन्थ् सेंच्युरींतील !"–आणखी हे मोठ्या अक्षरांत काय लिहिलें आहे ! "अशा प्रकारच्या अगदीं नवीन तयार केलेल्या प्रयोगास आमच्यांतिल मोहोरपें, देशसुधारक, देशभक्त, आपल्या अक्लांचा कळवळा बाळगणारे, बाल विवाहाचे द्वेष्टे, पुनर्विवाहाचे कैवारी, आणि खरोखर नव्याचे अभिमानी आपला पूर्ण आश्रय देऊन आणखी असेच नवीन प्रयोग करण्यास उमेद देतील अशी पूर्ण आशा आहे." हें काय झालीं सह्यां. सारखें लिहिलें आहे कोण जाणे ! हा ताजा कलम काय बुवा ! हें फ्यामिली नाटक असल्यानें आणि नाइन्टीन्थ् सेंच्युरीच्या धर्तीवर धरल्यानें यांत हलकट लोक व हलकट स्त्रियांचा समावेश. नाहीं हें सुचिवणें नकोच !!! बराहे नाइक साहेब, येतों तर आतां आह्मीं. ( जातानां ) आज रात्रीं तर नाटकाला जायचें बुवा. पाहूं तर खरी गम्मत !

---

## प्रवेश २ रा. (आगंतुक.)

**स्थळ–रंगभूमी.**

**पात्रें–नाटकाचार्य आणि नटी.**

ना०–( भांबावल्या सारखा हातांत पत्र घेऊन आपल्यासीच ) आतां या सुधारक मंडळीची अक्कल तरी गेली कुठें ! अहो तुह्मीच 'ना दोघा चौघांनीं मिळून हें नाटक तयार करून दिलेत! तालमी द्यायला तुह्मीच

ना रोज येत होता ! तुमच्याच ना शिफारसी वरून आजचा प्रयोग धरला ! आणि आतां लिहून कळिवता का —आणि तेहि तुह्मी आला नाहींत ह्मणून तुह्मांला गाडी पाठिवल्यावर—कीं तुमच्या प्रयोगांत रामदास शिवाजी, आणि स्त्रीस्वातंत्र्याला विरोध दाखिवणारी त्यांत स्त्रियाचीं पात्रें आहेत ह्मणून आम्ही येत नाहीं ! वहावाहो गाजी ! अहो पैसा मिळिवण्या करितां—आतां दुसरे धंदेच रहाले नाहींत ह्मणून—आह्मी आपल्या वायकां घेऊन तुमच्या पुढें तोंडें रंगवायला तयार झालों, आणि आयते वेळीं, जाहिराती लावल्यावर, गांवांत घरोघर प्रुफें वांटून वारा तास मध्यें गेल्यावर, प्रेक्षकांची थिएटरमध्ये गर्दी झाल्यावर, आतां तुह्मी आह्मांला तोंडघशीं पाडतां आं ! अहो हीं पात्रें नको होतीं, तर तीं मी का योजिलीं होतीं ? आणि समजा असली तीं पात्रें, तर तीं तुमच्या जवळ कांहीं खाऊ का मागताहेत! रामदास, शिवाजी, यांचीं सोंगें आणलीं ह्मणून सगळेच का आतां लोक रामदास आणि शिवाजी होणार आहेत ! हीं नाटकें पाहून वीरश्री अंगांत येणारी आतां प्रजा राहिली नाहीं ! तुमच्या सारख्या भ्याड सुधारकांनीं तिचे पाणींच आकर्षण करून घेतलें आहे ! हेंच पहा आलें कीं नाहीं आह्मी आमच्या सहधर्मचारिणी भार्या घेऊन तुमच्या पुढें नाचायला ! बरें, काह्रो आज खेळ वंद ठेवूं ? ( जवळ कुणि नाहींसें पाहून शरमल्या सारखा होतो, इतक्यांत नटी येते.)

न०— ( आपल्यासीच. ) यांना देश सुधाऱ्याचीं नाटकें तयार करायला पाहिजेत! ह्मणजे यांनीं करायचं काय—चार गोड गोड गोष्टी बोलून यांत कांहीं नाहीं, त्यांत कांहीं नाहीं, अशा थापा मारून आह्मांला दारूचं व्यसन लावायचं नि आमची थट्टा करायची ! या पायीं दोन वेळां तर यानीं आमची फजिती उडिवली ! ह्मणून मी काल पासून जपते आहे, कीं तसा प्रसंग आज तरी न यावा— पण आज हा तिसराच प्रकार झाला ! ना ध्यानीं ना मनीं—पण पत्र पाहून भांबावून बाहेर आल्याचा अपूर्व वेडेपणाचा प्रकार नटी सूत्रधारच्या वहाण्यानं उरकून ही वेळ तर मारून न्यावी—मग पडद्यांत गेल्यावर पुढचा प्रकार पाहूं. ( मोठ्यानें. ) प्राणनाथ, आपण ज्या

कार्याची आज योजना केली आहे, तें तडीस नेण्या करितां अशी उदासीनता का बरं धारण केली आहेत ?

ना०—( बैठकीचें ठिकाण पाहिल्यावर थोडासा शुद्धिवर येऊन आपल्यासीच. ) विघ्नहर्ता गजानन देव, आणि बुद्धिदाती सरस्वती देवी, यांचा मंगलकार्य समयीं अनादर केला, तेंच हें पातक या वेळेस पुढें उभें राहिलें ! आतां तरी मंगलदेवतांना येथूनच आधीं नमस्कार करावा. ( करतो. ) ( उठून मोठ्यानें. ) प्रिये, तूं फार चतुर आहेस, त्या योगें माझी अंतःकरणांतील सर्व स्थीति जाणून वेळींच या स्थळीं मला प्रोत्साहन देण्या करितां आलीस, तेणें करून मजवर तुझे फार उपकार झाले आहेत !

न०—प्राणनाथ यांत उपकार करण्या सारखें माझ्या हातून कांहींच झालें नाहीं ! प्राणनाथाला हर प्रसंगीं सहधर्माचारिणी स्त्रियेनें मदत करावी, हा आह्मा १६ व्या शतकांतील पतिव्रता स्त्रियांचा धर्मच आहे !

ना०—प्रिये, हा एकोणिसावा शतक आहे—विसरलीस वाटतें ?

न०—प्राणनाथ, मला विसर नाहीं पडला ! पण १९ व्या शतकांत दिखील सर्वच स्त्रियांनीं पातकानें आपली काया भिजवून घेतली नाहीं ! प्राणनाथ आपल्या मनांत असा का बरं संशय आला ?

ना०—प्रिये, त्याजबद्दल तुला कांहीं वाटायला नको—पण माझी मनोदेवता १६ व्या आणि १९ व्या शतकांत खालवर खालवर अशी तरंगायला लागली !

न०—प्राणनाथ राग न येईल तर मी विचारते हे—स्त्रियांची वर्तणुक १६ व्या शतकांतील स्त्रीधर्माला अधिक श्रेयस्कर आहे किंवा १९ व्या?

ना०—प्रिये त्वां आतां फारच उत्तम प्रश्न केला आहेस, आणि त्याचें उत्तर पर्यायानें जरीं तुझ्या भाषणांत तुला न कळत येऊन गेलें आहे, तथापि तें उत्तर या प्रसंगीं त्वां मागण्या विषयीं आग्रह न धरावास. कारण आपल्या योजित कार्यभागाला आतां आपण आरंभ केलाच पाहिजे—कारण आतां बराच उशीर नाहीं बरें झाला !

न०—( मनांत. ) भाषणांत कुठें विसंगतपणा झाला नाहीं हें एक बरंच झालं. ( मोठ्यानें ) प्राणनाथांची आज्ञा प्रमाण. त्या तिकडून कुणी

बायका इकडे येताहेतसं वाटतं तेव्हां आपण इथून लवकरच जावं हें बरं. ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ—रामाचें दर्शन घेऊन बाहेर पडण्याचा रस्ता.

पात्रें.—उमा आणि पार्वती.

उ०—पार्वतीबाई, आतांशा कांहीं बोलणीं चालतात का तुमच्या घरीं ?

पा०—घरीं बोलायचं पुष्कळ होत असतं—पण अजून वेळावरच्या गोष्टी आहेत. सर्व बंदोबस्त अजून झाला नाहीं—अशा प्रकारचं असतं.

उ०—बरं कायहो पार्वतीबाई—आपले पुरुष हातांत तरवारी, ढाला, बंदुका, घेऊन बाहेर गेले, ह्मणजे आपण सगळ्या बायका घरांत काय करूं बरं?

पा०—आपण आपल्या घराचं, देशाचं, आणि पतींचं संरक्षण करूं.

उ०—आपण आपल्या घरांचं संरक्षण मागचीं पुढचीं दारं लावून करूं, शहराचं रक्षण भोंवतालच्या तटाचे दरवाजे बंद करून करूं—पण मी त्याला मारीन—नाहीं तर तो मला मारील, असा निग्रह करून जे आपले पुरुष रणांत जाऊन शत्रूबरोबर भिडतील, त्यांचे आपण रक्षण कसं करूं?

पा०—अहो आपल्या पातिव्रत्य धर्मानं ! आपली पति चरणी एकनिष्ठा हेंच एक निर्वाणचं शस्त्र त्यांच्या विपरीत प्रसंगीं त्यांच्या रक्षणार्थ सुदर्शना प्रमाणें पाठवूं !

उ०—आपलं कडकडीत पातिव्रत्य त्यांचं रक्षण करील—पण देवाच्या मनांतून आजच त्यांना यश द्यावं असं न आलं तर ?

पा०—पतिव्रता स्त्रियेच्या मनांत, पतीचा विपरीत परिणाम होईल अशी कल्पनाच येऊं नये—पण दैवयोगानं लढाईंत असा परिणाम झाला, तर उभयतांना इहलोकीं व परलोकीं श्रेयस्करच होणार आहे.

उ०—तो कसा काय ?

पा०—इहलोकीं आपल्या पतीच्या शौर्याला किर्ती वरील, नि परलोकीं पतीला उत्तम गति मिळून त्याजसमागमें जाण्याला आपल्याला साधन होईल.

उ०—तसं जाण्याला इहलोकच्या अडचणी आडव्या आल्या, तर ?

पा०—अडचणीच आल्या, तर धर्मशास्त्रा प्रमाणें कृच्छ्र चांद्रायणादि मार्ग

वैधव्य स्थितींत आचरण करून कालाची वाट पहात पतिचरणाचें चिंतन करीत बसावें.

उ०—आपल्या सर्वच स्त्रियांची अशी समजूत असेल का ?

पा०—कालमान विपरीत झालं नसलं तर अशीच असेल.

उ०—पण काय हो पार्वतीबाई, आतांशा कुणि रामदास ह्मणून मोठे साधू आले आहेत ह्मणतात, त्यांच्या कांहीं गोष्टी तुमच्या घरीं कुणि बोलतात का ?

पा०—तो साधु असून शस्त्रधारी वीर पुरुष आहे असं ह्मणतांना एक वेळ मी ऐकलं होतंसं वाटतं—

उ०—आणखी कायं त्या साधु पुरुषाचं तुमच्या मनांतून बोलायचं होतं ?

पा०—कायसं बोलणार होतें खरी, पण विसरलें आता. पण काय हो, आपल्या सगुणाबाईच्या नवऱ्याच्या दुखण्याला कांहीं विशी एकुणिशी आहे का ?

उ०—बाई कांहीं नाहीं—नवऱ्याला जें औषध तेंच ती घेते, नवरा जितकं खाईल, तितकंच ती खाते, नवरा जितकं पांणी पिईल, तितकंच ती पितें, ऊन तर ऊन, थंड तर थंड ! असं नवरा बायकोचं प्रेम पाहिलं किनई, ह्मणजे समाधान वाटतं. त्या बिचारिला आठी प्रहरांत झोंप कशी ती नाहींच. आमच्या सासूबाई ह्मणत होत्या, कीं त्या सगुणाची धन्य आहे !

पा०—चला तर आज आपण तिच्या घरीं जाऊं. ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—जंगलांतील आश्रम.

**पात्रें.—रामदास; कल्याण, शिवाजी आणि इतर शिष्य मंडळी.**

( आश्रमांत शिष्य कल्याण बैठकीची जागा साफ करीत आहे इतक्यांत शिवाजी येतो. )

शि०—आज समर्थांची स्वारी कुठें बाहेर गेली आहे वाटतें !

क०—होय—पण आतां इतक्यांतच स्वारी यायला झाली.

शि०—समर्थांच्या तबियतींत आज कांहीं गरमपणा वा नाहीं ना !

क०—छे छे. समर्थ ह्मणजे काय—केवळ शांतीचे सागर आहेत !

शि०शांतीचे सागर तर खरेंच—पण कोप आला तर प्रलयाग्नि सहन करवेल, पण समर्थांच्या डोळ्यांकडे प्रत्यक्ष काळालाहि पहावणार नाहीं!

क०—असें तर खरेंच. त्यांचा कोप ब्रह्मांडाचा क्षणार्धांत लय करील !

शि०—ह्मणून पुसतों, कीं ताबियतीच्या रागरंगा प्रमाणें आगाऊ इषारत होत असावी, ह्मणजे तितक्या बेताबातानेंच विनंति करण्याला बरी.

क०—आज स्वारी मोठ्या दिलखुषींत आहे—आणि आपली आज दोन तीन वेळां आठवण केली होती.

शि०—( घाबरून ) आज काय दर्शनाला येण्याला मला उशीर लागला!

क०—नाहीं—आपली वेळच आहे यायची. समर्थ आलेसे वाटतात.

("रघुवीर" असा रामनामाचा घोष करीत समर्थ येतात. सर्व शिष्य मंडळी उठून उभी रहाते. शिवाजी समर्थांच्या पायावर मस्तक ठेवून नंतर हात जोडून व मान खालीं करून उजवे बाजूस उभा रहातो. )

रा०-शिवाजी,आणि सर्व शिष्य मंडळीनों बसा.(समर्थ आधीं व क्रमानें सर्वजण बसतात.) शिवाजी, वेड्या तुला पहावेसें मनांत आलें,आणि त्या वेळेस तूं दृष्टीं पडला नाहींस, तर मला अगदींच फिरे वेडावल्या सारखें होऊन जातें !

शि०—इतकी समर्थांची मजवर कृपा आहे, तर माझ्या भाग्याला पारावारच नाहीं ! आज आश्रमांत दर्शनाला मी येण्याबरोबर समर्थांची स्वारी नाहीं, असें कळतांच, माझ्यावर इतकी अवकृपा होण्यासारखा माझ्या हातून काय अपराध घडला, या विचारांत मला कांहीं सुचेनासें होऊन गेलें. समर्थ अंतर्ज्ञानी आहेत——

रा०—कल्याणा, ऐकतो आहेसना माझ्या शिवबाचें बोलणें ! बा शिवाजी तुझी निस्सीम भक्तिच फिरे माझ्या अंतःकरणाला तुजविषयीं ओढते!

शि०—समर्थांच्या चरणा जवळ माझी काय ती सेवा इतकीच, कीं अमुक ठिकाणीं जाऊन अमक्याला झोडून अमुक शहर काबीज कर, इतका समर्थांचा हुकुम निघायची खोटी, कीं त्याच वेळेस समर्थांच्या पायांवर डोकें ठेवून आशिर्वाद घेतला कीं तसेंच निघायचें. पराक्रमाच्या नांवाचा मात्र मी अधिकारी—बाकी समर्थांच्या आशिर्वादाचा प्रताप !

रा०—शाबास शिवाजी शाबास—रघुवीर तुला यश देवो. बा या यवनांनीं

आमल्या राज्यमदानें भारती धर्माचा अजिबात विध्वंस करण्याचा घाट घातला होता—पण तुझ्या सारखा पुण्यप्रतापि संभालून, हिंदुधर्माचा कैवारी व खरा अभिमानी पुरुष उत्पन्न झाल्यानें, धर्माची व्यवस्था लागून वर्णसंकर न होतां वर्णाश्रम व्यवस्था नीट लागेल, असा त्या यवनांना तुझा वचक बसला आहे ! शाबास शिवबा शाबास ! बा कल्याणा, माझ्या शिवबाला फार शिण झाला आहे !

शि०—मला शिण होण्या सारिखी अजून पर्यंत माझ्या हातून समर्थांची काहींच कामगिरी झाली नाहीं ?

रा०—कल्याणा, माझ्या शिवाजीच्या अंगावर बोटाबोटाच्या अंतरानें अनेक वार झाले; हजारो बंदुकीच्या गोळ्या याच्या अंगाला चाटून गेल्या, नाना प्रकारच्या संकटांत हा पडला, रात्र केव्हां पडली, दिवस केव्हां उजाडला, ह्याचें याला कित्येक दिवस भानच नव्हतें, आठ आठ दिवस घोड्यावरचें आसन याचें ढळलेंच नाहीं, नाहीं उन, नाहीं थंडी, नाहीं वारा, नाहीं तहान, नाहीं भूक, अशी अवस्था झाली, तरी बेटा ह्मणतो शिण झालेच नाहींत !!! खरेंच, अरे राज्य करूं इच्छिणाऱ्या पुरुषानें असेंच सदोदित अश्रांत असावें, नेहमीं राज्यकारस्थान करीत असावें, प्रत्यहीं निदान एक पाऊल तरी जमीन आपल्या राष्ट्रांस जोडीत असावें, सैन्य वाढवीत असून त्याजवर आपली नजर ठेवावी, आणि त्यांतले हुषार हुषार लोक निवडून सरदार करावें, राष्ट्रांतील लोकांस हत्यारबंद रहाण्या विषयीं त्यानां उत्तेजक भाषण करून देणग्या देत असावें, राजनीति उत्तम प्रकारची ठेवून प्रजेची स्वामीभक्ति वाढवावी, वर्णाश्रम व्यवस्था ढिली पडूं न देता, ज्याच्या त्याच्या गुणाप्रमाणें त्याचा सन्मान करावा, विश्वासुक अशी पक्की खातरी करून घेऊन, निरनिराळ्या जोखमाचीं कामें निरनिराळ्या मनुष्यावर सोपवावीं, आपली प्रीति, किंवा आपली अवकृपा, ही योग्य प्रसंगावांचून राजानें कधींही प्रगट करूं नये, दूत द्वारानें सर्व ठिकाणची बातमी आणित असावें—परंतु प्रसंगास उचित त्या पेक्षां ज्यास्त बंदोबस्त करूं नये, देवाधर्माच्या ठिकाणीं अकृत्रिम प्रेम ठेवून सज्जनांचा आदर करावा, वीरश्री सदोदित जागृत राहील अशा गोष्टी निरंतर बोलत व ऐकत असावें, राजानें आपली उब कोणाला

जिंकू देऊ नये, आणि अन्याया पासून फार लांब रहावें—कल्याण या इतक्या प्रकारचें वर्तन माझ्या शिवबाचें आहे बरें !

शि०—( मनांत चपापून व खालीं मान करून. ) हा अपराधी शासनास पात्र आहे. अंतर्गत वर्तमान समर्थ जाणणारे आहेत.

रा०—बेट्या तू कांहीं अपराध केलास असें समजून मी कांहीं बोललों नाहीं ! आपल्या नित्य नेमा प्रमाणें तुला कांहीं तरी गोष्ट सांगावी, ती आज अशा प्रकारची सांगितली !

शि०—माझा अपराध मला कळून आला—क्षमेची विनंति आहे.

रा०—शिवबा, तुला पाहलें, ह्मणजे माझा रागचं लटपटून जातो ह्मणून तुझा अपराध कशाचा आणि काय कशाचें ! पण महाराष्ट्र आणि हिंदूचें राज्य हें राजकीय भूषण राखण्या करितां अनेक प्रकारचे धर्मपंथ कायम राखले पाहिजेत. नाहीं तर वर्णाश्रम बंधन तुटून गोंधळ होईल आणि वर्ण व्यवस्था अनावर झाल्यावर तिजपायीं महाराष्ट्र राज्याला जबरदस्त धक्का बसेल !

क०—( हातजोडून ) रघुवीराला नैवेद्य समर्पण करण्याची वेळ झाली.

रा०—ठीक आहे. शिवबा, सर्व मंडळीसह रघुवीराचा प्रसाद घेऊन मग आपल्या दरबारांत जा.

शि०—आज्ञा प्रमाण. (सर्व जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

स्थळ—गटारयंत्र.

**पात्रें—शिळोप्याच्या गप्पा छाटणारी मंडळी.**

१ ला०—लाडूवर लाडू आणि जिलबीवर जिलबी ! विसरत चला आज पासून !

२ रा०—ही राजकारभारावर अशी दिवटी मंडळी येत चालली हाच शकून आहे!

३ रा०—आहो, आतांशा पहावें तों ज्याची त्याची आपली कानांत कुजबुज !

४ था०—सगळीच आंतून फितुरी चालली आहे !

५ वा०—अहो यांना काय ! धनीचें मेपपात्र मग होळीवर पोळी कां नाहीं केली !

६ वा०—यवनी मोडून महाराष्ट्रशाई शिवाजीनें बनिवली, तिच्या कायम विस्ताराचा घाट पहिल्या बाजिरावानें घातला—तो कायम राखायचा तें तर रहालेंच एकिकडे, पण घर फोडून धड आपल्याला नाहीं—ना यजमानाला, असें हे करणार !

७ वा०—अहो, ग्रात कांहीं कर्वती काठची मंडळी, आणि कांहीं अर्जदार मंडळी, उत्पन्न झालेली आहे; तेव्हां झाला तर असा प्रकार व्हावा हें साहजिकच आहे !

८ वा०—अहो आतां ही राजफितुरी चालली आहे—पण पुढें फितुरीला जागा नाहींसी झाली, ह्मणजे धर्मफितुरी सुरू होईल !

९ वा०—कर्वतीकाठची, आणि अर्जदार मंडळी जसजसी ब्रह्मदेव उत्पन्न करील, तसतसा हा प्रलय जारीनें चालणार !

१० वा०—गाढवें, खेचरें, बैल, उंट, शेळ्या, बोकड, मांजरें, वगैरे पशूंनीं त्यांना मनुष्य जन्मांत न घातल्या बद्दल ब्रह्मदेवावर पक्षपाताचा आरोप केलेले कीं नाहीं ते अर्जदार !!!

११ वा०—मग ती तर आतां वशिल्याची मंडळी येणार !

१२ वा०—आणि जसजसा आतां या मंडळीचा भरणा ज्यास्त होऊं लागेल, तसतसें हे आपल्या मानेवर जूं घ्यायचें, आणि तुह्मांलाहि पण वाकवायचेंच !

१३ वा०—आतां गटार यंत्री गप्पा पुरेत—चला दर्शनाला !

१४ वा०—अहो या गप्पा नव्हत—हा आतां असा प्रकार थोडथोडा सुरू व्हावयाचाच ! तुह्मी आह्मी आणखी कांहीं दिवस जिवंत राहलों, तर आपल्या डोळ्यांनीं पाहूं !

१५ वा०—आतां या पुढें मी सांगतों ऐका—स्वराज्य नकोसें होईल !

१६ वा०—स्वराज्य काय पण स्वधर्म, नीति व आचार, हीं देखील बदलतील!

१७ वा०—सर्व सोडून तीं आपलीं कुलंगी कुत्रीं होतील ! माझ्या आई, आजच पुढचीं भविष्यें नका करूं "ब्रह्म वाक्यो जनार्दनः" असें व्हायचें —चला कसें आतां हें यंत्र बंद करा पाहूं ! ( जातात. )

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**–पुढची ओटी.

**पात्रें:–फरडा मुत्सद्दी–जनार्दनपंत–त्याचाबाप–**
**वामनराव–**मुत्सद्दीचा स्नेही.

**फ०मु०**–( चिरूट ओढीत टेबलावर पाय टाकून आपल्यासीच. ) आप ल्याला ईश्वरानें ज्ञान दिलें ह्मणतात–वट् व्हेअर् इज् ही? आय् क्यान् प्रुव्ह् ऑफ् हिज् नॉन्–एग्झिस्टन्स् ! आणि एकंदर जगताचे इतिहास वाचून पाहिले, तर आपल्या लोकांच्या कांहीं तरी विरुद्ध विलक्षण प्रकार सुरू केल्यावांचून जगांत आपला लौकिकच होत नाहीं ! आज तारखेला परमेश्वर सत्तेनें–ड्याम् इट्, हा कुठून बुवा आमच्या तोंडांत येऊन बसला आहे ! आह्मी परवशतेंत आनंदानें दिवस काढीत आहोंत! ह्या एक नेचरनें आमच्यावर मोठाचें उपकार केला आहे ! नाहीं तर आमच्या या जनकोबानें प्रत्येक पावलीं, आमच्या श्रीमुखांत फाडदिशीं फडकावलीच असती ! हे आले पहा–हातांत तुळशीची परडी आणि दुर्वांचा जुडा घेऊन ! पण त्यांचा उपयोग एखाद्या जनावराला केला, तर तें बिचारें उपकार स्मरून कांहीं तरी उपकार फेडील ! पण हे दगडाचे आणि तांब्याचे गोळे काय करणार ! ( इतक्यांत जनार्दनपंत येतात त्यांला पाहून. ) या तुह्मी जनकोपंत-नाहीं पण जनकोबा, इटस् ऍन् इझि फार्म ! तुह्मीं जो हा फुकट वेळ गमिवता, आणि व्यर्थ श्रम करतां, त्या पेक्षां एखादें सार्वजनिक देश कल्याणाचें काम केलेंत, तर शहाणे लोक तुह्मांला "भुमीला भार आणिं खायला काळ" अशा सारखे रिणायस्वरूपी दगडोबा तरी ह्मणणार नाहींत !

**ज०**–( मुलाकडे रेखून पाहून मनांत. ) तरी ह्मटलें असें का–आज माझ्या बाव्याचे कान लांब दिसताहेत !

**फ०मु०**–आमच्याकडे पहा ना, क्षणभर तरी रिकामपण असायचें होतें ! पैसे मिळवायचा धंदा देखील आमचा घात करतो–पण रिकामपण सांपडण्याबरोबर, जा याच्या घरीं, भेट तिला, दे व्याख्यान, कर उपदेश, धुम सपाटा चालला असतो !

**ज०**– ( पुन्हां मुलाकडे नजर करून मनांत. ) हा काय आरशीचा गुण आहे! ( आरशी काढून ) नाहीं–याची मानहि पण पुढेंच आलेली दिसते !

फ०मु०—मिस्तर् जनको, तुमच्यानें ज्ञातारपणी आमच्या सारखी आतां तरतारितपणाची कामें व्हायचीं नाहींत, हें आह्मीं समजतों, पण बसल्या बसल्या घरांतल्या व आसपासच्या बायकांना तरी शिकवून, चिथावून—आह्मीं नवऱ्याच्या ताब्यांत दास्यत्वा प्रमाणें नाहीं रहाणार, आमचा बर्थराइट् ह्मणजे केसांचा हक्क नेचरनें दिला आहे, त्याची दुष्ट पुरुषांच्या क्रूरत्वानें आह्मीं पायमल्ली करूं नाहीं देणार, अह्मीं विवाह व पुनर्विवाह आपल्या खुषीनें पाहिजे तेव्हां, आणि पाहिजे त्या मन मिळालेल्या पुरुषा बरोबर करणार, अशा अशा विचारांची त्यांच्या मनांत प्रेरणा करून एकदम पोलिटिकल् ऍजिटेशन् तर सुरू कराल !

ज०—( मनांत ) नाहीं—पण बाब्याचे हात देखील आतां पाया सारखेच दिसूं लागले !

फ०मु०—नाहीं पण मिस्तर् जनको—तुह्मीं असा मनांत विचार करा, कीं देशाची, आणि त्यांतील सर्व पुरुषांची आणि स्त्रियांची सर्व बाजूंनीं सुधारणा करण्याचा आह्मीच [illegible] मक्ता घेतला आहे ! धर्माची, ह्मणालें सुधारणा आह्मीच करा ! आचाराची, आह्मीच ! शेतकऱ्यांची, आह्मीच ! खाण्या पिण्याची, आह्मीच ! स्त्रियांची, तीहि पण आह्मीच !!!

ज०—(मनांत) हां रांडलेकाच्या !—आतां तर याला लांब आणि गोंडस मोठें झुपकेदार शेंपूट दिसायला लागलें !!!

फ०मु०—( दांत ओठ खाऊन ) अहो पण बाबा साहेब! ( चपापून मनांत ) बरें झालें या वेळेस येथें कुणि परका नाहीं हें ! नाहीं तर आह्मी यांना "बाबा" ह्मणून हाक मारायची, आणि दुसऱ्यानें हें असलें चिन्ह पाहून आश्चर्य करून विचारायचें—तुह्मी असे ***आणि हे का तुमचे वडील ! खालींच मान घालायची वेळ होती कीं नाहीं ! ( मोठ्यानें ) ह्मटलें आंत जाऊन कांहीं औषध घ्या—उगीच खोकत खो-खो-खो नका करीत बसूं येथें—या वर्तमानपत्रांत आमच्या विषयीं काय मजकूर आज आला आहे तो वाचूं द्या आह्माला !

ज०—तरी ह्मटलें, माझा मीच मी आहे, कीं मी आणखी कुणि दुसरा आहे !

फ०मु०—हो हो तुमचे तुम्ही तुम्हीच आहात ! आहात बरें का तुम्ही !

ज०—नाहीं, मला वाटलें होतें, कीं तूं आणखी दुसरा कोणा जवळ बोलतो आहेससा !

फ०मु०—आणखी कोणा जवळ! आतां हा भूतचेष्टांवर विश्वास ठेवण्याचा सोळावा शतक नाहीं ! अहो तुमचेच तुह्मी, आणि आमचेच आह्मी असें दोघेच या ठिकाणीं असतां "नाहीं, मला वाटलें होतें, कीं तूं आणखी दुसरा कोणाजवळ बोलतो आहेससा". असें बोलायला जनकोबा तुमच्या या वयाला शरम कशी वाटत नाहीं ?

ज०—खरें बाब्या ! असला अमर्याद व पचकळ विनोद माझ्या स्वप्नांत देखील कधीं आला नाहीं ! मुलगा विद्या शिकून तारा झाला खरा ! आतां तूं उभय कुलांना बत्ती लावशील खरी ! वहावारे बाब्या—बाब्यापण बाब्या खरा ! माझा बाब्या ! वारे !!!

फ०मु०—बस बस, पुरे करा असले हलकट शब्द बोलायचे ! देअर् कम्स् माय् ऑनर्ड् फ्रेंड् मिस्टर् वामनराव—आणि तुह्मांला मी साफ सांगतों, कीं हल्लींच्या आमच्या थोरावलेल्या स्थितींत तुह्मी कांहीं आह्माला आमचे बाप असें शोभत नाहीं, याजकरितां एखाद्या खेडेगांवांत जाऊन रहा आतां, आणि आहेच तुह्माला सवय धोत्रें बडवायची, तीं कोणाचीं तरी बडवून आपल्या पोटांत कांटे भरा—ह्मणजे आह्माला देशाला आळशी केल्याचें पातक तरी लागणार नाहीं ! हं, चला घरांत, जा येथून कसें ! ( जातो आणि वामनराव येतो. )

वा०—आर् यू रेडी मिस्टर्— ?

फ०मु०—ओ यस्, ओ यस्—कम् अलॉंग् सर् ! ( शेकह्यांड् होतो. )

वा०—बरें तुवा आजचा बंदोबस्त कसा काय ठेवलेला आहेत ? ( दोघे बसतात. ) आपल्याकडे दोन गृहस्थांच्या फारच भिडा आल्या आहेत !

फ०मु०—इन्व्हिटेशन् कार्ड्स् आर् इशूड् , आणि यामुळें मला वाटतें, कार्डा वांचून कोणाला ऍडमिशन् मिळणार नाहीं ! बट् हौएव्हर् यू इंक्वाअर् वुइथ् द सेक्रेटरि. पण मला ठाऊक आहे, आणि ती पण माझीच सूचना होती, कीं पेपरवाल्यांना देखील बोलावूं नयेत.

वा०—सेक्रेटरि ह्मणजे काय !

फ०मु०—यू गेट् देम् वुइथ् यू, ऍण्ड् वुइल् सी आफटरवर्ड्स् बट् कम्

आलौंग् वुइथ् मी—लेट् मी ड्रेस् फर्स्ट्— ( पोषाग करतो ) रावसाहेबाकडे जाऊं.

वा०—ऑल् राइट्. आय् ह्याव्ह् नो बिझिनेस् नौ—चला. ( जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

### स्थळ—देवघर.

पात्रें:—रावसाहेब—राधाबाई—रा०चे कुटुंब—व्यंकंभट शागीर्द, ताई—रा०ची मुलगी—फरडा मुत्सद्दी आणि वामनराव इ०

वा०—हेंच रावसाहेबांचें घर—आपण आणखी पुढें कुठे चाललों !

फ०मु०—ओ—आपण बोलण्याच्या नादांत तसेंच पुढें गेलों असतों ! (आंत शिरल्यावर ताई केळीच्या पानाचा जुडगा बांधीत बसली होती तिला पाहून) आज हा कोणाला मेजवानी करण्याचा बेत आहे ?

ता०—मेजवानी नाहीं कुणाला—पण पक्ष आहे उद्यां.

फ०मु०—पक्ष ! कोणाचा आणि करणार कोण ?

ता०—आमच्या अजोबांचा, नि रावसाहेब करणार आहेत.

वा०—कोण—रावसाहेब ! आणि पक्ष करणार आहेत ? मोस्ट् स्ट्रेंज् थिंग् इज् धिस् !—

फ०मु०—मग रावसाहेबांची तर चांगलीच तासली पाहिजे ? बरें ताई, आज ' किंडरगार्टनर ' नाचाला जाण्याच्या तयारींत असायचें, तें हें काय करीत बसलीस ?

ता०—रावसाहेबांनीं जायचं नाहीं ह्मणून सांगितलें !

फ०मु०—कां जायचं नाहीं ह्मणून सांगितलें !

ता०—ते ह्मणतात, कीं आपल्या घरच्या पोरींनीं अशा नाचांत जावूं नये—पण माझी शाळा दिखील त्यांनीं बंद केली.

फ०मु०—तूं कसें हें ऐकलेंस, आणि शाळेंत जायची बंद झालीस?

ता०—मला त्यांनीं सांगितलं, कीं तुझ्या **** असा असा अभिप्राय

तुझ्या सासऱ्यानें कळिवला आहे, ह्मणून तुला आतां शाळेत पाठवायचेंच नाहीं.

फ०मु०—नाहीं तुझ्या नवऱ्याला आवडत, तर असला जंगली नवरा पाहिजे कशाला? आणि असें तूं बापाचें, आईचें आणि नवऱ्याचें, ऐकूं लागलीस, तर स्त्रीदास्यविमोचन होऊन स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य कधीं होणार! बरें रावसाहेब काय करताहेत!

ता०— ते आंघोळ करून देवघरांत पार्थीव पूजा करीत बसले आहेत.

फ०मु०— पार्थीवपूजा करीत बसले आहेत! हा गृहस्थ तर चळला! जा आंत जाऊन सांग आह्मी आलों आहोंत ह्मणून.

ता०— रावसाहेबांची ताकीद आहे— देवघरांत ते पूजा करीत असतील तेव्हां कुणि जाऊं नये ह्मणून.

फ०मु०—ती ताकीद पहातों मग कशी काय आहे ती! ( आंत जातात. )

रा०— ( पार्थीव हातात घेऊन धूप दीप नैवेद्य अर्पण करीत असतां फरबा मुत्सद्दी आणि वामनराव करें करें बूट वाजवीत आलेले पाहून व मनांत शर्मून. ) अरे कोण आहेरे व्यंकंभट, गोंद्याला सांगून बाहेरच्या दोन खुर्च्या आंत आणीव. आणि ह्मणावें 'यांच्या' पायांतले हळूच बूट काढून बाहेर नेऊन ठेव.

फ०मु०— ( व्यंकंभट बाहेर जाऊं लागतोसें पाहून ) अरे ए लंठ्ठभारती, इकडे ये आधीं, आणि तुझ्या रावसाहेबानां विचार, कीं ही हात पसरायला हातांत पळीपंचपात्री घेऊन व टाळकी रंगवून आलेली भट, आणि तू स्वतः, ही देशाला आळशी व भिकारी करण्याचीं साधनें, तुह्मीच का घरांत बाळगलीं आहेत!

वा०—नमस्कार रावसाहेब! आंतून हें असलें, आणि बाहेरून तें तसलें, हें तर बुवा आजच आपल्या दृष्टीस पडतें तुमचें!

फ०मु०—अरे, आपण असले जुनाट वेडे चाळे करायचे तर करायचें आणि त्या बिचारीला स्त्रीदास्यांतून मोकळे करायचें, तें सोडून देऊन मिसेस राधाबाईला हातांत पोवळ्याची माळ देऊन तुळशीच्या प्रदक्षणा घालायला लावली!! वहावा रावसाहेब वहावा!!! आज आतां तुमच्यां येथें येण्यापूर्वीं आमच्या थेरड्याची जशी पूजा केली, तशीच तुमची आतां केली पाहिजे!

राधा०—( प्रदक्षणा घालीत असतां रावसाहेबांस. ) आपलं आटपलं असलं तर हीं बोलणीं बोलायला बाहेर जायचं होतं एकदांचं—

रा०—( बसलेल्या भटजींस. ) भटजी हा आमचा मित्रभावाचा विनोद आहे! व्यकंभट—बरें कांहीं नाहीं, सांपडले. (आठ आठ आणे दोन भटांना दक्षणा देतो—भट आशिर्वाद देऊन जातात. ) व्यकंभट, माझें आटपलें सगळें, आतां तूं येथलें सर्व आवर, आणि घरांत तयारी झाली असली, तर पानें वाढायला सांग लवकर. कारण आपल्याला दोन तास तरी लवकर गेलें पाहिजे.

फ०मु०—ए व्यंक्या, तीं सगळीं भांडीं गोळा कर आणि बाहेर कचऱ्याच्या प्रेटींत फेकून दे.

व्यं०—माझा रावसाहिब काई तुमी नाई, तो मी तुझा ऐकतों!—मोठा शहाणा झाला असेल, तर तूं आपले भटाला सांग. मला वाटतों हा कोणि हिंदू नसेल, तो त्याला देवाचा कंटाळा! पापी, भ्रष्ट, महा चांडाळ कोठला!

फ०मु०—आय् से होल्ड् यूअर् टंग्—

व्य०—तूं आणखी ओरडशील पण मी तुला कशाला भितों!

राधा०—व्यकंभट तूं आपलं काम आवर—घरांतून कांहीं तुला कुणि बोलत नाहीं—मग तूं का रागावतोस ?

व्य०—असा कुणि बोलला ह्मणजे माझ्या अंगाचा संताप होतो. रावसाहेब असा कधीं नाहीं बोलतो!.

राधा०—मीं आहे घरांत ह्मणून ठीक आहे! उगीच कुठें थोडीशी लोकांत कुजबुज व्हायला लागली—कीं आधीं प्रायश्चित्त घ्यायला लावते! माझं साफ सांगणं असतं—कीं तुह्मी बाहेर पाहिजेल तसं बोला—पण घरांत तसले वेडे ढंग चालणार नाहींत. माझ्या ताईची शाळा बंद करविली कीं नाहीं! ती शाळेंत जाऊं लागल्या पासून पहातें, तों तिच्या मनांत सोवळ्या ओवळ्याचं कांहींच यईनासं झालं—नि घरच्या कामांत तिचं कसंतें चित्तच नाहीं! या पोरींना गायला नि नाचायला शिकवून काय करायचं आहे!

रा०—मिस्तर फरडा मुत्सद्दी, या इल्लिटरेट् मनुष्यांचे बोलणेंच मनास आणतां उपयोग नाहीं! आमची तर बुवा मिस्तर् वामनराव अशा

माणसांच्या जवळ गांठ पडली आहे ! लेट् अस् गो इन् टू हॉल् ऍंड् ह्याव्ह् आ फ्री टॉक् ऑन् दि आफ्टरनून् सब्जेक्ट्. (तिघे जातात )

व्यं०—रावसाहेबाला काय—तो आपला शंभूचा अवतार आहे ! कोणाची लुच्चेगिरी पण समजतो नाई—आणि कोणाचा घात पण करतो नाई ! आपलां कुणि सांगेल तसा ऐकतो !

राधा०—हो, कांहीं कुणि कमी नाहीं ! दिवसा ढवळ्या लोकांच्या घराला आगी लावणारे आहेत !—पण मी वस्ताद आहें, ह्मणून घरांत ज्याला त्याला आपली सांबाची मूर्ती दिसते !

व्यं०— बरा तर मी जातों. आतां सयपाघरांत, आणि बगतों पान मांडाला झाला का. (जातो.)

राधा०— व्यंकंभट, ताई बाहेर असेल, तिला ह्मणावं आंत ये. (ताई येते.)

ता०— कायग आई ! तुझी किनई बाई भारीच किटाकिट असते !

राधा०—मेले किटाकिट कशाचीग माझी तुला आहे ?

ता०—नाहीं तर कायग—निवड तांदूळ, चिर भाजी, आण पाणी, घाल प्रदक्षणा, सारा दिवस मेलं कांहीं तरी काम आहेचं तुझं !

राधा०—पोरींच्यां जातीला आयतोबा करून हणगोवा सासऱ्या पाठवायची वाटतं ! बरीच तूं आतां बोलायला शिकलीस !

ता०—हाणगोवा कशानं—तर काय मेलं सारा दिवस कामच करीत बसायचं !

राधा०—काय तरी बाई—जसं कांहीं कुणि ह्मणेल, कीं अमक्याची मुलगी माहेरीं येऊन काम करून करून भागली, नि तिंची बोटबोट हाडं आंत गेली, नि वीतवीत मास वर आलं !

ता०—हो मी कांहीं सासऱ्याहून इथें आल्या पासून लठ्ठ नाहीं झालें !

राधा०—लठ्ठ नाहीं झालीस—जुन्या चोळ्या मात्र अंगांत शिरेनाशा झाल्या ! दांडोबा आपला—

ता०—हो तर, मला कांहीं काम करायला तुह्मीं माहिरीं नाहीं आणलीत.

राधा०—ह्मणून तुला कांहीं देव्हाऱ्यांत बसवून ठेवण्या करतां आणली नाहीं !

ता०—मी कुठें ह्मणतें तसं—पण शाळेंत घालण्या करितां.

राधा०—पुरें चहाटळपणाचीं बोलणीं—सोळं नेस नि एक माळ घाल.

ता०—अं अं अं मी नाहीं जा आज घालीत.

राधा०—का कुणि अंगांत आलं वाटतं आज ?

ता०—मी आज रावसाहेबांच्या बरोबर जाईन—

राधा०—पाहीन कशी जाशील ती, नि तुला नेतं कोण तें ?

ता०—असं ग काय हें आई—शाळेंत पाठवायची नाहीं तर नाहीं, नि आज नाचय पण पहायला जाऊं द्यायची नाहीं !

राधा०—तुह्मा यवढाल्या घोड्या पोरींना शाळाग कशाला हव्या ? शाळेंत जाऊन विटाळ मात्र कालवायचा घरांत! नाहीं सोवळं, नाहीं ओवळं, नाहीं मर्यादा, नाहीं भीड, हेंच शिकायचं कीं नाहीं शाळेंत जाऊन!

ता०—मघाशी फरडे मुत्सद्दी मला बोल्ले कीं नाहीं !

राधा०—त्या फरड्या मुत्सद्याच्या बायको सारखं तुला व्हायचं असेल !

ता०—तिच्याग सारखं तें काय व्हायचं ?

राधा०—घरांतलं कांहीं काम नको करायला—उठबसल्या जा फिरायला—पुरुषांत बोकळायचं—नि सारा दिवस नट्टफट्ट करीत असायचं—घरचे पुरुष घरांत आले काय नि गेले काय ! मेले नांवाला नवरे करून ठेवायचे !!!

ता०—मग बायकांनींच वाटतं सारीं कामं घरांतलीं करावींत—नि कध्धीं फिरायला जाऊं नये वाटतं ! तर मग तूं मला अशीच घरांत कोंडून ठेवणार तर !

राधा०-सहा महिने कार्टीला शाळेंत जाऊन झाले नाहींत तों हा असला विनय शिकली! बायकांना घरांत कोंडून ठेवायच्या, त्यांना स्वतंत्रता द्यायची नाहीं त्यांचे हालहाल करायचे, त्यांचे केश वपन करून त्यांना विद्रूप करायच्या, त्यांना पुनर्विवाह करूं द्यायचे नाहींत, त्यांना विद्या शिकवायची नाहीं, त्यांचे हक्क त्यांना द्यायचे नाहींत—असं बोलायला या आमच्या चम्रक भोवान्या शिकल्या, ह्मणजे आमच्या स्त्रिया झाल्या शाहण्या ! पण असं ह्मणणाऱ्या या अडाणी शहाण्या पुरुषांना असं कळत नाहीं, कीं या तुह्मीं उष्ट्या उचलेल्या शब्दांनीं, या अविच्यारी बायका लज्जा खुंटीबर गुंडाळून ठेवून, तुह्मीं त्यांना आवडत नाहीं. असं म्हणून भडाभड तुह्मांला सोडून जाऊं लागल्या, तर तुमची काय दशा होईल! या कार्टीची मला कांहीं धडगत दिसत नाहीं—गृहकृत्यांत शोभा देणारी संसारिक मर्यादेची जी शाळा या वयांत लागायची, ती हिला ही असली उलटी शाळा लागली !!!. ताईबाई, ही तुझी कीर्ती ऐकूनच

तुझ्यीं सासरचीं माणसं आम्हांला चांगलं बक्षीस देतील हो !!! तूं चाय्ती हो कशी आपल्या सासऱ्या—त्र्यंबकभटाला बरोबर देऊन उद्यां तुझी सासरी रवानगी करतें.

ता०—( रागावून ) घालतें हो बाई सोळं नेसून प्रदक्षणा—उगीच चडफडायला नको—मी सासऱ्या गेलें, ह्मणजे शाळेची गोष्ट दिखील काढायची नाहीं.

त्र्य०—( येऊन ) बाई—सयपाक सगळा झाला—पान मांडून मी तयार केला. आतां रावसाहेबाला बोलवूं ?

राधा०—माझं आटपलं—मी पण चाललें आंत—पण काशीकर भटजी आले आहेत का ? ते यायचे आहेत आज जेवायला. ( जातात. )

---

## प्रवेश ८ वा.

स्थळ—नांचा करितां एका बागेंत मुद्दाम शृंगारलेली जागा.

पात्रें:—फरडामुत्सद्दि, विदुषी—त्याची बायको, वामनराव, प्रितांई—वामनरावाच्या कोर्टिंगांत असलेली एक सकेशा, रावसाहेब, राधाबाई, ताई, मिस्तर आणि मिसेस् भालेराव, आणखी कांहीं कोर्टिंगांत असलेले स्त्रीपुरुषांचे जोडे, कांहीं एकट्याच स्त्रिया, झुलफिकार—शिपाई वगैरे.

( बागेच्या दरवाज्यावर " ऍडमिशन् फॉर् टिकिट् होल्डर्स् ओन्लि " अशा शब्दांची एक मोठी पाटी लावलेली आहे. दोन दरवाज्यांवर दोन लिहितां वाचतां येणारे मोठ्या दरजाचे शिपाई उभे आहेत. आमंत्रित लोक जोडप्यानें, व स्नेहि स्नेहि मिळून येताहेत. दरवाज्यावर कडीकोट बंदोबस्त असल्यानें हजारो लोक बाहेर उभे आहेत. )

से०—वेल् झुलफिकार; ( व्यवस्था करण्या करितां नेमलेला एक मनुष्य. ) सब् जिन्नस जगजगेपर रखा है ऑल्‌राइट् ?

झु०—जी साहेब—फरडे मुत्सद्दी अन् वामनराव मघांच येऊन पाहून गेलती.

से०—देखो—संभालो, नाहीं तर हम तुमारे अंगपर पडेगा !

झु०—फस्ट कलास अरंजमंट केली आहेन्—तैय्यार लेस हुन.

से०—ऑलराइट्, बट् झुलफिकार देखो, सब् जगेपर अच्छी तऱ्हेसी नजर

रखना. कायके वास्ते, आजका नाचका समारंभ तो अव्वल है, इसवास्ते बहोत बदमाष लोक अंदर घुसेगा, और ए बाटली फ़िटली देखके सबे गाममे पुकारा करेगा—ओ नहीं होना बस.

छु०—चाहिए तो ऐसा बंदोबस्त रखेंगे—आपके होकुम बगर किस्कूबी खोलीके अंदर नै जाना देएगा. और क्या !

से०—नै नै नै नै—ऐसा नै काम करना. नाचवाले लोगोकूं बंदी नै करना, और ओ लोगोकूं हम हुकूम बी नै देना सकता—तूं अच्छे तऱ्हेकी नजर रखना बस.

छु०—अच्छा—तैशीबी नजर रखेंगे. ( इतक्यांत फरडे मुत्सद्दी आणि विदुषी येतात. )

से०—( सामोरे जाऊन. )मिस्तर् ऍंड् मिसेस् फरडे गुड ईव्हनिंग्.(शेकह्यांड होतात.)

वि०—वेल् मिस्तर् सेक्रेटरि, आय् डोन्ट् सी यूअर् मिसेस् हिअर् —

से०—आय् ऍम् सॉरी शी क्यानॉट् कम् टुडे, बीइंग् बाहेरची !

वि०—नॉनसेन्स् व्हॉट् आफ् धाट् ! हे तुह्मी आह्मां स्त्रियानां शहाण्या करण्याच्या खटपटी करणार ! दिवे ओंवाळा ! बायकांची मनधरणी करून त्यांना आणण्याचें तुमच्या अंगांत पाणी कुठें आहे ! ( रावसाहेब सहकुटुंब येतात. )

फ०मु०—आय् एम् व्हेरि ग्ल्याड् टू सी—देअर् कम्स् रावसाहेब वुइथ् हिज् फ्यामिली !

से०—आणि सगळे०—( एकदम ) ओ गुडईव्हनिंग्—गुडईव्हनिंग्.( शेकह्यांड होतात. )

फ०मु०—ओ हिअर् कम्स् अवर् ग्यालंट् फ्रेंड् मिस्तर् वामनराव वुइथ् हिज्-

( त्यांनां पाहून सगळे आनंद प्रदर्शक टाळ्या वाजवितात, आणि बाकीची निमंत्रित मंडळीहि सगळी जमते. ) ( सर्व रोषणाईचा थाट पाहून व बाकीची व्यवस्था पाहून खुष झाल्या बद्दल सेक्रेटरीची आपसांत तारिफ करतात. )

से०—[ मुत्सद्दीच्या कानाजवळ लागून. ] ऑल् जंटलमेन् ऍंड् लेडीज—(हे शब्द ऐकतांच सर्व जाग्यावर बसतात. ) आज पहिलेंच आपणा सर्वांचे या शृंगारलेल्या रम्य हॉल् मध्यें कान्फिडेन्शिअल् ग्यादरिंग्—अर्थात पुढें जे असें वारंवार प्रसिद्ध सुखोदयाचे योग येणार त्यांची आज पहिली तालीम इतक्या अल्प काळांत घडून आली, ही गोष्ट जगाच्या एकंदर

इतिहासांत, आणि त्यांत विशेषें करून आपल्या नावांजलेल्या शेहराच्या इतिहासांत नमुद करण्या सारखी घडली, असें ह्मणण्यास मला मोठी प्रौढी येते आणि अत्यंत आनंद वाटतो ! आज या स्थलाची शोभा पाहून, व चित्रविचित्र पोशाकानें मित्रभावानें व एकच हेतू सिद्धीस नेण्याच्या इरादानें स्त्रीपुरुषांचा मेळा जमल्याचें आमच्या देशाचे इतिहासांत अपूर्व व अश्रुत असें हें पहिलेंच उदाहरण ह्मणण्यास मला कांहीं हरकत दिसत नाहीं. आज ज्या आनंदाचा सोहळा भोगण्या करितां, जाति विकल्याचा त्यांग करून, आपण येथें जमलों आहोंत, त्या आनंदांत, बोलण्याचे कामीं व्यर्थ वेळ खर्च करून, आपल्या आनंदांत अंतर् पाडावें, असा माझा हेतू मुळींच नाहीं, पण काय करावें ! हा आनंद माझ्यानें आवरेनासा झाला, आणि त्या योगानें या आनंदाच्या उकळ्या शब्दरूपानें तोंडावाटें बाहेर काढल्या वांचून रहावेना ! असो—हें शॉर्ट् बोलणें संपिवण्यापूर्वी आपल्या आजच्या समाजाला व्यवस्थेशीर पणा यावा या हेतूनें मिस्तर् रावसाहेब यांनीं अध्यक्ष स्थान स्विकारावें अशी सूचना करून मी बसतों.

प्रि०—अहाहा ! आजच्या दिवसाचें किती तरी बाई ह्मणून वर्णन करावं!! ज्या लोकांच्या रानटी रिवाजांनं त्यांच्या बायकांना पुरुषांत येऊन बसण्याची चोरि, बसण्याचं तर रहालंच एकिकडे—पण नुस्तं आडून दिखील एकाद्या पुरुषा जवळ बोलायचं भय ! भय ह्मणजे किती—कीं अशी गोष्ट पुरुषाला कळण्या बरोबर डोळे गरगरावून आकाशपाताळ एक व्हायचं ! नि तशांत माझ्या सारख्या अवस्थेला येऊन पोंचलेल्या बिच्याऱ्या बाईचं केंव्हांच टाळकं सोलायचं !—पण तसले भयंकर दिवस जाऊन आज स्त्रीपुरुष परस्पर सारखे हक्क मानूं लागले, नि गतभर्तृकांची त्यांना दया येऊं लागून डिअर् मिस्तर् वामनरावा सारखे लोक—फार तर काय, पण मी नाचवीन तसें नाचूं लागले ! ह्मणून असा दिवस आज आमच्या देशाच्या प्रालब्धानें उगवला आहे, इतकेंच मी बोलून मिस्तर् सेक्रेटरींनीं केलेल्या सूचनेस अनुमोदन देतें.

फ०मु०—स्त्रियांना पुरुषा प्रमाणें पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे, किंबहुना पुरुषाहि पेक्षां थोडें जास्तंच असावें, असें विचार करतां करतां सर्व विद्वान व शहाण्या लोकांना वाटूं लागलें आहे! आणि त्या प्रमाणें बहुतेक लोक वर्तन करण्यास

निर्धास्त झाले व होत चालले, हें आजच्या मङ्गलप्रसंगानें सिद्ध झालें आहे! पण अजूनहि आमच्या मंडळींत कित्येक जुन्या लोकांचे वेडेवेडे चार करणारे आहेतच! पण ही त्यांना अत्यंत शरमेची गोष्ट आहे! कारण ते इतके शिकले असूनहि, व लोकात प्रसिद्धपणी सुधाऱ्या पंथाचीं व्याख्यानें देत असतांहि, त्यांच्या अंगांत मॉरल् करेज् न यावें, ही गोष्ट आश्चर्य व दुःखं करण्या सारखी नाहीं असें कोण ह्मणेल? घरीं पाहावें तो त्यांची पार्थीव पूजा आहेच! भटुरड्यांना दक्षणा आहेतच! माळा हातांत घेऊन तुळशीच्या प्रदक्षणा आहेतच! श्राद्ध पक्ष आहेतच! अशी जर आमच्या नवीन सुधारक पक्षांत आपलीच फितुरी मंडळी निघेल, तर आह्मी ह्या नवीन उभ्या केलेल्या सिव्हिलीझेशनच्या महत्कृत्याला जबरदस्त धोका बसणार नाहीं असें कोण ह्मणेल? आपल्या धर्माच्या संबंधानें आणि आपल्या आचारांच्या संबंधानें, आपल्या स्त्रियांना उत्तम प्रतीचें शिक्षण आणि पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्या वांचून—सुधारणा होणें कठीण! आणि—स्त्रियांच्या बाबतींत जों पर्यंत आपलें पाऊल पुढें सरकणार नाहीं, तों पर्यंत राजकीय कामांत आपण कधींहि योग्य होणार नाहीं! आमचा बोलण्याचा झोंक, रात्रंदिवस देशकल्याणाच्या विचारांत आमच्या डोक्यांतील मेंदूचा खल चाललेला असल्यानें, भलतीकडेसच वळण्याचा संभव फार आहे, याच करितां आटपतें धरून मिस्तर् सेक्रेटरीच्या सूचनेस मीहि अनुमोदन देतों.

**मि॰ भा॰**—प्रिय मित्र हो—आतांच्या मंगलदायक कृत्यास एक पळाचाहि विलंब लावणं, ह्मणजे माझ्याच जिवावर एकादी पांच मणाची धोंड आणून ठेवल्या सारिखं होतं—पण काय करूं? दुसऱ्या एकाद्या प्रसंगीं माझ्या मनांत आज गलबल करीत असलेले विचार माझ्या प्रिय मित्रां पुढें आणीन असं वाटून मनाला आवरूं पहातें, पण तुह्मां पुरुषांच्या अकृत्रिम ममताळू पणानें आम्ही स्त्रियांस जें स्वातंत्र्य मिळालें आहे, त्या स्वातंत्र्याचा कदाचित दुरुपयोग केल्याचा चार्ज आमच्यावर येईल, या भीतीनं माझ्या मनांत गलबल करीत असलेले विचार येथें जमलेल्या माझ्या प्रिय मित्रांना कळिवल्या वांचून माझ्यानं रहावत नाहीं. स्वातंत्र्य या शब्दानं कुणि कुणाला त्रास देण्या सारिखं केलं नाहीं,

म्हणजे ज्यांचं तें मनुष्य आपल्या खुषी प्रमाणं वागण्यास मुखत्यार नाहीं, असं ह्मणणारा एकादा तरी जीव या मनुष्यांत असावा असं मला तर वाटत नाहीं—पण नशीबच आह्मा स्त्रियांचं खोटं ! आह्मांला कितीहि स्वातंत्र्य मिळालं, तरी तें स्वातंत्र्य असं कांहीं चमत्कारिक आहे, कीं त्या स्वातंत्र्यापायीं महिना पंध्रा दिवसा तरी आमच्या पाठींत दांडकीं बसलीं नाहींत, असं होतच नाहीं!!! तेव्हां आम्हां स्त्रियांची कळकळ बाळगून जें असलं स्वातंत्र्य आमच्या करितां तुम्हीं दिलंत, तें कोणच्या तरी गांवाहून विकत आणलंत ? असा एक प्रश्न, आणि तुमच्या मता प्रमाणं आमच्या दास्य स्थितींत आमच्यावर दांडक्यांचा जो प्रसंग येत नव्हता, तो हल्लीं स्वातंत्र्यता मिळाल्या पासून येऊं लागला, म्हणून आम्हीं स्वातंत्र्य मिळाल्यावर नवऱ्यांना सोडून राहूं लागलों नाहीं, हीं स्वतंत्रतेचं काम पूर्णपणीं बजावण्यांत आमची चूक होते कीं काय ? हा दुसरा प्रश्न, असो; अत्तांचं माझं बोलणं कोणकोणाला न रुचण्या सारखं झालं असेल, तें मी समजतें, नि अत्तांच गोड केलेल्या खिरींत मिठाचे दाणें टाकावें अशी माझी इच्छा नाहीं, म्हणून झालेल्या सूचनेस अनुमोदन देऊन मी बसतें.

राधा०—प्रियकर मित्रांनों आजच्या आनंदाच्या समारंभांत मला थोडंसं तरी बोलूं द्या ह्मणून मी तुमची विनंति करतें. नि अत्तांच माझ्या प्रियमैत्रीण ज्या बाई जे कांहीं शब्द बोलून गेल्या, त्या शब्दांवरून दोन शब्द बोलल्याविना माझ्यानं रहावतच नाहीं ! मनुष्याला जसं वळण द्यावं तसं लागतं, मग का बरं त्या करतां पुरुषांनीं कुरकुर करावी ! चार चांगल्या बायका जवळ असल्या, ह्मणजे देवाधर्मांचं पुष्कळ करावंसं वाटतं, शिवाशिव करूं नयेसी वाटतं, आपला बायकांचा जल्म सुखाचा आहे असं वांटतं, आपल्या आज्ञेतच जसं कांहीं पुरुष वागतात असं वाटत असतं—पण तेंच अशा आनंदकारक समाजांत पाऊल टाकण्याबरोबर कसंसंच वाटूं लागतं, तो प्रकार माझ्या मैत्रिणींनीं आतांच बोलून दाखिवला आहे—

रा०—[ मनांत. ] आपलें मनुष्य आपल्याला ठाऊक—कुणिकडे भकेल याचा नेम नाहीं—एकांची एकीनें उडिवलीन आणि ही आतां आमची उडिवणार—तेव्हां अध्यक्ष या नात्यानें वेळेची सबब सांगून यांना बंद

कराव्या तें बरें. ( मोठ्यानें ) आतां कोणी जरी कांहीं बोलले तथापि अखेर सुचना आह्मीं अध्यक्ष स्थान स्विकारावें अशीच होणार, त्या प्रमाणें आजच्या आमच्या विदुषीबाईच्या व सर्वांच्या मता प्रमाणें या मंगल समारंभाचें अध्यक्षत्व पतकरण्याचा सर्वांनीं मिळून जो मान दिला त्याजबद्दल मला फारच आनंद झाला आहे, आणि ते स्थान मी वेळे कडे पाहून लवकरच स्विकारतों. पण हें पद स्विकारण्या पूर्वीं सर्वांचे आभार मानणें व प्रसंगास उचित असे दोन तरी शब्द बोलणें या वेळेचें माझें कर्तव्यच आहे असें मी समजतों. जितके व जितक्या स्त्रियांना स्वातंत्र्य प्राप्त व्हायला पाहिजे होतें, तितकें व तितक्या स्त्रियांना स्वातंत्र्य प्राप्त झाल्याचें आज नजरेस येत नाहीं, ही कांहीं अंशीं जरीं दुःख मानण्या सारखी गोष्ट आहे, तथापि कालाच्या सपाव्यांत तोहि सुदीन पहाण्याचा लवकरच योग येण्याचें आजच्या मंगल समारंभाचें दर्शन एक सुचिन्हच आहे ! सर्व स्त्रिपुरुषांनीं ध्यानांत ठेवण्या सारखी ही गोष्ट आहे, कीं सुधारणा एकाएकींच होत नाहीं. परंतु आपल्या लोकांची सद्यःस्थिती, त्यांचे विद्येच्या योगानें झालेले पोक्त विचार, व त्यांची बुद्धीची ग्राहक शक्ति इत्यादि गोष्टींचा विचार केला असतां, आजच्या मानानें आपल्या स्त्रियांत लवकर सुधारणा होण्यास फार वेळ लागेल असें मला वाटत नाहीं. लवकर सुधारणा व्हावी एतदर्थ आपण आपल्या कडून निरालस्य व जंगी मेहनत करतों, पण तिला यावें तसें अद्याप यश येत नाहीं. याचें कारण—जुन्या मतांच्या लोकां कडून आपल्याला सर्व प्रकारांनीं आडथळेच येतात. धर्म प्रकरणीं आडथळ्यांना आपण दरबारी बाऊ उभा केल्या पासून खाद्याखाद्य, पेयापेय, इत्यादि प्रकर्णांत चांगलाच बंदोबस्त झाल्या सारिखा दिसतो, आणि त्यामुळेंच शुक्राचार्या सारखी ब्रह्मविद् मंडळीं मनसोक्त दारू पीत होती, ह्मणून पराक्रमी होती, असा आधार धरून, नुक्सान होईल त्यानेंच पाहिजे तर पिऊं नये, अशा एक्सेपशनवर धुमधडाका दारू पिऊन मंडळी गटारावर पडलेली सांपडते, पण मगदूर नाहीं एकाची, कीं कुणि पुढें येऊन तूं दारू पिऊन गटारांत पडला होतास असें ह्मणण्याची ! पण लेखणीच्या आडथळ्याला आजून पर्यंत रामबाण उपाय सांपडत

नाहीं—तथापि त्यालाहि आह्मी एक इलाज काढला आहे, आणि तो सर्वांनीं ध्यानांत ठेवून अनुकरण करण्या सारखा आहे. तो असाः विरूद्ध लेखणी दिसली, कीं लेखणी सुद्धां लेखकार छिंछोर, लुच्चा, पाजी, इंडीसेंट् ,अञ्जागल—अशा प्रकारचें काहुर, एकदम काहुर माजवून मोठा थोरला गिल्ला सुरू करावा—आणि गुप्त रीतीनें हर तऱ्हेची हर प्रकारानें मदत त्याचें नुकसान होईल अशा बद्दल मिळविण्याची खटपट करावी. हा असा क्रम जारीनें सुरू झाला, कीं चोहोंकडे एकदम दात्र बसून भरदिशीं सुधारणा होईल ! सुधारणा सुधारणा तें आणखी काय ? असो. इतके बोलून मी नाच सुरू करण्याची मी आतां परवानगी देतों.

( वाद्यांच्या गजरांत देशीविदेशी नाच सुरू होतो. नाच सुरू असतां दमलेली मंडळी मधून मधून खाद्य व पेय ठेवलेल्या, खोल्यांतून व एकांत स्थळीं विश्रांति घेण्या करितां जातात. असा तनमन एक करणारा रंग मध्यान्ही पर्यंत होऊन मंडळी आपापल्या घरी जाते. ]

---

## प्रवेश ९ वा.

**स्थळ—गटारयंत्र.**

**पात्रें—दिक्षित, किसणें, फणसळकर, अष्टपुत्रे वगैरे गावकुटाळ मंडळी.**

कि०—फणसळकर, काल तर दिक्षितांनीं बुवा शुद्ध गोकुळाचा थाट बनिवला होता !

अ०—त्यांत फरक येवढाच होता, कीं सगळ्या गोकुळांत सगळ्या गोपींना मिळून एकच कृष्ण होता; पण या दिक्षिती नव्या गोकुळांत गोपींपेक्षां गोपाचीच रलचेल उडाली होती !!!

दि०—अहो हरि करील तर काय नाहीं होणार ! हा सर्व त्याच्या मायेचा खेळ आहे ! आणि मायेचा उगम कल्पने बरोबर आहे—तेव्हां कल्पना होण्याची खोटी, कीं लगेच सर्व तयार !

फ०—व्हावा हो दिक्षित ! किसणे, मारली येवढ्यांतच ऐंट दिक्षितानीं !

अ०—अहो हे 'दिक्षित' पद तुमचें नाहीं दिक्षित, तुह्मी आडनावें दिक्षित !

दि०—मी ह्मटलें आपले सगळे मिळून तुह्मी आपली माझी थट्टाच करतां!

कि०—दिक्षित, ऐट मारण्या पुर्ती मात्र तुह्मांला थट्टा नाहीं ना वाटली !

दि०—बरें काय हो किराणे, तुह्मी काय बोललां, हे काय बोलले, मी काय बोललों—आहे तरी काय हें कुट ? मला कळूं तर द्या.

अ०—आतां काय रडावें यांच्या पुढें ! का किराणे, फणसळकर—

दि०— (आंवट रागाऊन.) लेकांनो माझ्या पुढें रडूंहि नका आणि हासूंहि नका !

फ०—राग हा आपला ह्मातार्‍याच्या नाकावर ठेवलेलाच !

कि०—आहो तळ्याच्या कांठीं काल नंदनवनाचा सीन नव्हता झाला !

अ०—तुह्मी वेडेतर नाहीं त्यांना असें विचारणारे ! ते तर आपल्या छत्रीला घेऊन तेथें गेले होते !

दि०—( आळणी रागांत ) छत्र्या आतां तुमच्या आहेत खर्‍या—ठेंगण्या, ठुसक्या, गोंडस, गोर्‍या, चक्राकृति खोप्याच्या, तेव्हां तुह्मी गेला असाल खरें !

कि०—आह्मी जायचें, पण तुह्मी हाक मारतेत तर—पण तुह्मी कसले अप्पलपोटे ? तुह्मांला वाटलें, कीं तुमचें सुख आह्मी घेऊं अं—

अ०—दिक्षितांना वाटतें, कीं त्यांचीच बायको काय ती नृतगान कलेंत उत्तरा व्हावी !

फ०—दिक्षित महाराज,तुमची एकल्याचीच बायको पांच पतींचा उपभोग घेणारी सैरंध्री होऊं द्या ! आह्मालाइतक्या पठाईत पतिव्रता नकोत!

दि०—(रागावून)या लेकांचे डोळे फुटले त्यांना पगार मिळूं लागला ह्मणून! यांच्या बायकांना का कुणी जाऊं नका का ह्मणत होते ! मी तरी कुठें त्यांना जा ह्मणून सांगितलें होतें—पण ह्मणतात नाहीं, ऐकतो कोण आतां नवर्‍याचें ! येवढी घोडी, तरी ह्मणालीच मी जाणार, आणि तिला आमच्या यजमानांची आणि यजमानणीची फुस !

अ०—वाहवारे यजमान आणि वाहवारे उपाध्ये !

फ०—पण दिक्षित—दांडकी वसूं लागली कीं नाहीं पाठींत !

दि०—नाहीं बुवा अजून—फार करून त्या आपल्या बाहेरच, नाही तर

यजमानणीचाच कांसोटा धरून तिच्या येथें असतात. आणि खुर्चीत आल्या कीं नाहीं, ह्मणजे— ( मिटक्या मारून. ) बस्स एकूण अशीच बायको व्हावी अं !

कि०—दिक्षित फारसें पाणी सुटलें तोंडाला ?

दि०—लेको तुह्माला काय ! मला आतां पेणसल मिळणार !

अ०—तें कोणती कामागिरी बजावल्या बद्दल बुवा !

दि०—येवढावेळ पाडा वाचला तो फुकटच अं ! अरे लेका आमचा त्यांचा संबंध नवरा बायकोचा झाल्या बद्दल !

अ०—ह्मणून पेणसल होणार अं !

दि०—हो हो पेणसल होणार,ह्मणून तुझ्या नको तोंडाला पाणी सुटायला! खुशाल दोन वेळ खाऊन देवडीवर पत्रावळी लावीत बसण्याची जागा आतां त्यांनीं आह्मांला नेमून दिली आहे !

सगळे०—( एकदम )अस्सल दीर्घ चावट हा थेरडा खरा! काय त्रिच्याऱ्या त्यां माऊलीच्या थोरवीचें वर्णन करावें !

दि०—हो हो आणखीं एक राहलें—पण राहलें तर राहूं द्या !

अ०—बस्स माझ्या आई पुरे करा आतां !

दि०—तर हें मी का सुरू केलें ? पण तुमची एक टूम दाखिवली !

फ०—अहो टूम कशाची ! हा तर निवळ फार्सच केलात !

दि०—चला तर पुरे करा—लागा आपल्या उद्योगाला ! ( जातात )

---

## प्रवेश १० वा.

**स्थळ—एडिटर्स रूम.**

**पात्रें—फरडा नं० १—आणि खरडा नं० १.**

ख०—वेल् सर् ! तुह्मीं आपल्या कडून बंदोबस्तांत कांहीं कसर केली नाहींत—पण आमचा रिपोर्टर जाऊन व्हरव्याटिम् सगळी स्पीचेच् घेऊन आला! इतकेंच नाहीं—पण बारिक सारिक सर्व सुधारणा देखील पाहून आला !

फ०—( मनांत ) हें फार वाईट झालें. ( मोठ्यानें. ) तुह्माला बोलावूं नये, असा कांहीं मंडळीचा बेत नव्हता—पण घाईमुळें नजरचुक झाली असेल !

तरी मंडळीच्या चुकीकडे तुह्मी लक्ष न देतां आलात, त्यामुळें मंडळीच्या तर्फे मी फार फार तुमचे आभार मानतों !

ख०—असो—त्यांत तुह्मीं आभार मानण्याचें कामच नाहीं, पण आमचें काम मात्र आह्मीं हर प्रयत्न करून बजावलें !

फ०—वट् आय् होप् त्या संबंधामें नुस्त्या आनंद प्रदर्शक बातमी शिवाय तुह्मी त्यांतल्या बारिक सारिक डीटेल्स् देणार नाहींत !

ख०—नान्सेन्स्, त्यांतील प्रत्येक स्पीच् आणि प्रत्येक बारिक गोष्ट आमच्या वाचकां पासून चोरून ठेवणें, ह्मणजे आह्मीं आमच्या कर्तव्य बजावण्यांत फितुरी केल्याचें आपल्या हातानें आपल्या डोक्यावर खापर फोडून घेण्या सारखें आहे !

फ०—( मनांत. ) थोडी पोलिटिक्यालिटि लढविली पाहिजे. ( मोठ्यानें. ) यस् यू आर् परफेक्टालि राइट्—पण मी का असें ह्मटलें याचा मुद्दा तुमच्या लक्षांत आला नसावा असें वाटतें—अहो कोणतीहि चांगली नवीन गोष्ट पहिल्यानेंच सुरू करायची ह्मटलें, ह्मणजे ती पूर्णत्वाच्या उत्तम दशेस येऊन पोंचे पर्यंत तिच्यांत अनेक—पण पहिल्या पहिल्यानें सगळ्याच का ह्मणाना, वाईट परिणामीं गोष्टी घडायच्याच, या करितां पुढच्या चांगूलपणावर लक्ष देऊन आज घडणाऱ्या वाईट गोष्टींवर पांघरूणच घातलें पाहिजे—खरें कीं नाहीं !

ख०—एकूण तुह्माला देखील गोष्टी वाइट दिसतात तर !

फ०—आहो वाईट ह्मणजे काय ! जें आह्मी करतों त्याचे परिणाम आह्मांलाच फळास आले आहेत—जेथें तेथें आह्माला थप्पडच मिळते, घरांत सुख नाहीं— कारण ऐकतच नाहीं कुणि घरांत; बाहेर पहावें, तर चोंहिकडे फजिता! त्या मुळें असें तर असें—पण कां असें, तर पुढच्या पिढीवर नजर देऊन आह्मी वागण्याचा निश्चय केला आहे इतकेंच!

ख०—वहावा ! एकूण आपल्या शहाणपणाची सोळा आणे कमाल आहे! आधीं आपलें चांगलें आहे त्याला वाईट ह्मणून टाकायचें, आणि ज्याचा परिणाम आज वाईट असा धडधाडित अनुभवास येतो आहे, त्याला चांगलें ह्मणून घ्यायचें—आणि मग त्यांतील सगळे दोष छपवून सुधारणा करीत शहाणपणाचा टेंभा मिरवीत बसायचे ! असला

अजागलपणा आपल्याला नाहीं बुवा आवडत! कोडगा असेल त्यानें सुखेनैव करावा!

फ०—(रागावून.) एकूण तुह्माला आमची भीती कांहीं वाटत नाहीं तर!

ख०—इन् दि इंटरेस्ट् आफ् पब्लिक् गुड्—खऱ्या, सप्रमाण, आणि चांगल्या हेतूनें पाहिजे त्या गोष्टी बाहेर काढण्यास ब्रह्मदेवाची देखील कोणाला भीती नाहीं— त्याच्या पुढें तुह्मी हो कोण!

फ०—हं, एकूण आमच्या कारस्थानी लेखांचें तुह्मांला वजन अजून कळलें नाहीं वाटतें! खरडाच तर खरडा आतां पाहूं!

ख०—फरडाच तर आतां तुह्मी—फरडा फरडा!!! धमकी नको! (जातात.)

---

## प्रवेश ११ वा.

**स्थळ—दिवाणखाना.**

**पात्रें—वामनराव, प्रिताई—**वामनरावाबरोबर पुनर्विवाह केलेली. **गंपतराव—** प्रीताईचा स्नेही. **विदुषी. फरडा मुत्सदी** आणि एक **एडिटर**

प्रि०—वेल् माय् डिअर् अह्मी जान—तुह्मी पहा तर खरें मी कशी गम्मत करतें ती—हातिच्चारे, तुह्मी पुरुषा सारखे पुरुष असून आमच्या बायकां पेक्षांहि जास्त भित्रे!

गं०—नो ओ नो—मला भिण्या सारखा यांत कांहीं प्रकार नाहीं—पण आमची सुधारक मंडळी विद्यामृत पान करून इतकी तर झाली—तरी यांच्यांत धाडस कसें तें येतच नाहीं!

प्रि०—या धाडसी आह्मीच सुशिक्षित स्त्रिया! तुमच्या माझ्या प्रीतींत आमच्यांच्या मनांतील विकल्पानें अंतर पडतं असं चिन्ह दिसूं लागल्या बरोबर खाडदिशी मी डायव्होर्स् डिक्लेअर् करीन!

गं०—ओ माय् डिअर् प्रिताई, डायव्होर्स् डिक्लेअर् करण्यांचें तुझ्या हातांत नाहीं! कोर्टापुढें फिर्याद मांडली पाहिजे, पुरावा केला पाहिजे—आणखी दुसऱ्या गोष्टी शाबीद केल्या पाहिजेत—तेव्हां डायव्होर्स् डिक्लेअर् होईल!

प्रि०—सुधारणेच्या कामांत आम्ही किती पुढें सरकलों आहोंत, हें तुह्मी आमची सुधारणा करणारे—पण तुह्मांला देखील अजून कळलं नाहीं!

शेम् ! आहो आह्माला कोर्टांत जायला नको ! आह्मी डायव्होर्स् ह्मटला, कीं तो डिक्लेअर् झालाच पाहिजे ! ह्मणून आह्मीच कोर्ट !

गं०—तुह्मीच कोर्ट तीं कशी काय बुवा ?

मि०—आम्हीच वेड्या खऱ्या !—कारण स्त्रीजातीला पुरुषांची जरूरीच लागते ह्मणून तुमच्या सारख्या प्रिय पात्रांना शहाणं ह्मणावं लागतं! नाहीं तर मेलं हें का तुह्माला कळूं नये, कीं बायकांच्या रोगावर औषध देण्या करितां बायका डाकतरणी करण्याचा तुह्मीच ना धुमधडाका उद्योग चालविले आहेत ! नि तुह्मालाच अजून असं कळत नाहीं, कीं नवऱ्याच्या संबंधानें स्त्री जातीला जे बारिकसारिक जाच भोगावे लागतात, ते स्त्रियां वांचून तुमच्या सारख्या पुरुषा जवळ कसें सांगतां येतील ! अर्थात आह्माला नवरा नकोसा वाटला, कीं लगेच आमच्या कोर्टांत आह्मी डायव्होर्स् एकदम डिक्लेअर् करणारच! तुह्मी खुप समजून ठेवा, कीं दुसऱ्या बायकांसारखी मी दांडक्यांचा प्रसंग आंगावर घेऊन माहेरी पळून जाणारी बायको नाहीं ! मी ह्मणूनच [ गळ्यांत मिठी मारून ] यू माय् डिअर्—मी खचितच तुह्माला सांगतें, कीं तुह्मांला भिण्याचें कांहींच कारण नाहीं ! [ वामनराव येतो. ]

वा०—[मनांत संतापून.] या अवदसेला आतां काय बोलावें ! मनुष्यानें सहन तरी किती करावें ! हा आतां दुबार मार झाला ! आणि तो आतां मुकाट्यानें सोसावा लागणार ! परवांच आमच्या एका ओल्ड् फ्रेंडनें अशाच मासल्याचा कांहीं प्रकार विचारला, तेव्हां पहा ! तो लुच्चा असेल अशा समजुतीनें मी त्याला असें सांगितलें, कीं नान्सेन्स् हौएव्हर् कीप् इट् इन् यूअर् माइंड—आणि आतां हें आमच्या स्वतःच्या मनांत ठेवायचें !! ( मनोद्गारांचा आवेश सहन न होऊन मोठ्यानें ) विचार! विचार! विचार !! आग लागली त्या मानवी दयेच्या विचाराला !

गं०—परवशता प्रलयाला कारण होत नाहीं—असें आतां माझ्यानें ह्मणवेल काय ? वामनरावजी क्षमा करा !

वा०—परवशता प्रलयाला अशी कारण होतें—ही तुमची गुड् मॉरल् क्यारेक्टर् आं ? ( हातांतील काठी उगारतो. )

गं०—( काठी धरून. ) हं हातघाईवर येण्याचें कारण नाहीं. आधीं आपली स्वतःची चौकशी कर—मग पुढचा विचार.

वा०—ड्याम् रास्कल्—डोळ्यांनीं मी स्वतः पहातों आणि चौकशी कशाची कर ! तुला माझ्या पश्चात् माझ्या घरीं येऊन एकऱ्यानें गप्पा छाटीत बसण्याचें कारण काय !

गं०—हा प्रश्न आपल्या बायकोला विचार—मला विचारूं नकोस.

प्रि०—( मनांत )आतां आपली अक्कल कांहीं तरी लढिवली पाहिजे.(मोठ्यानें) कोण आहेरे बांहेर राम्या—नाक्यावर जाऊन आधी एक शिपाई बोलाऊन आण लवकर. मला पाहूं दे माझ्या घरांत दोन भामटे कोण शिरले आहेत ते ! दिवसा ढवळ्या भर रस्त्यावरच्या. घरांत अशी पुंडाई काय ही !!

वा०—चोर नाहीं मी—घराचा मालक आहें.

प्रि०—चोराला घराचा मालक कुणि केलं ! नि तो दुसरा कोण बोलतो आहे ?

वा०—तो कोण बोलतो आहे म्हणून मला विचारतेस का ?

प्रि०—माझ्या प्रियांना येउं दे मग तुम्हांला ते सांगतील कसं काय तें !

वा०— ( आश्चर्य करून ) आणखी कुणि तुझे प्रिया आहेतच का ! ( मनांत ) या एका सोटभारथीनें माझी काठीच धरली, दुसरे का कुणि आले,तर माझा चेंदामेंदाच करतील !

प्रि०—( मनांत ) आतां वेडच घेतलं पाहिजे, त्या शिवाय हें खटलं निवळत नाहीं. (मोठ्यानें) ऐसे प्लीज् व्हाट् बॉटल् आगेन्—वुइल् यू !

वा०—हां, दारूहि पिऊन तयार आहे तर स्वारी ! वहावारे आमची सुधारणा—आम्ही पुनर्विवाह केला, ती तर झकमारलीच ! पण पवित्र मद्यालाहि घरांत आणून ठेवलें ! नशीब आमचे नि काय !

गं०—हं रावसाहेब, असें थोडे शुद्धीवर या जरा !

वा०—आम्ही शुद्धीवर येऊं, कीं बेशुद्धीवर असूं— [ इतक्यांत विदुषी येते. ]

वि०— [ मनांत ] या लोकांच्या चेहऱ्यावरून कांहीं दांडक्याचा प्रकार दिसतो ! ( मोठ्यानें) वेल् डिअर् मिस्तर् ऍंड् मिसेस् वामनराव—

प्रि०—[ रागानें ] विदुषीबाई पुनर्विवाह करण्या विषयीं अशा बेहुरमत मनुष्या बरोबर चांगली सल्ला दिलीत ! यांनीं शेण खायला भडकत दुसरीकडे जावं नि घरीं येऊन असले वेडे ढंग करीत बसावं ! परकी मनुष्या बरोबर मारहाण !

वि०—नान्सेन्स्, मिस्तर् वामनराव कांहीं अशा प्रकारचे मनुष्य नाहींत! वेल् मिस्तर् वामनराव—तुम्हींहि पण भालेरावी करूं लागलेत का?

वा०—( रागानं ) यानीं परकी मनुष्याच्या गळ्यांत हात घालून बसावें!

पि०—विदुषीबाई मी 'दारूच्या इंफ्लुअन्स् मध्ये होतें नि त्यामुळें पडूं लागले म्हणून या [ गंपतरावाला दाखवून. ]माझ्या डियर् जानीचा आश्रय घेतला!

वि०—[ प्रकार समजून ] इतकेंच ना! मग हो त्यांत काय—मी म्हणतें गळ्यांत हात घातला नि सगळ्या अंगाला विळखा घातला म्हणून होतं काय! दारूच्या अमलांत केलेलीं सर्व कृत्यें माफच असतात! बरं झालं, दैवयोगानं हे गृहस्त इथें होते! नाहीं तर पिताई पडती नि तिला कांहीं इजा झाली असती म्हणजे? [ गंपतरावाकडे पाहून ] थ्यांक् यू माय् डिअर् न्यू फ्रेंड्!

गं०—अहो विदुषी बाई—परवशतेचे परिणाम असेच प्रलयकारक असतात हें अजून कसें या सुधारकांना समजत नाहीं!

वि०—जळ्ळी मेल्यांची समजूत! व्याख्यानं देतांना मात्र लांब लांब तोंड करून द्रौपदी, तारा, अशा बायकांच्या पातिव्रत्याची वर्णनं करतात! —इंद्राणीला हजार इंद्र झाले तरी चालतात! तीं आपली पतिव्रताच— पण यांच्या घरीं मात्र दुसरा कुणी खपत नाहीं! मग हे असे दांडक्याचे प्रसंग!!

गं०—बाई ही तुमची सुधारणा चांगली आहे!

वि०—आमची सुधारणा कसली!—यांनीं सुधारणा चालविली आहे! नि यांच्या सुधारणेंत लोक शिरत नाहींत, म्हणून त्यांना हे अविचारी, निर्दय, पशु, अर्धोंडावस म्हणत असतात! आतां अविच्यारी कोण आहेत, ते मिस्तर् वामनराव तुम्हीच सांगा पाहूं! अहो फरडे शहापण तुम्हांला मिरवायचं असेल, तर आतां तुम्हांला आमची बायकांचीच अक्कल घेतली पाहिजे! हें शिका आधीं तुम्हीं!

ए०—[ वामनराव बोलत असतां फरडा मुत्सद्दी व एका पत्राचा एडिटर असे दोघे येतात ] बायकांची अक्कल शिकायची नाहीं कोण म्हणतो! कुत्र्यांत जरी थोडीशी अक्कल दृष्टीस पडली, तरी ती आम्हीं घेतल्या वांचून सोडीत नाहीं!

फ०मु—सुधारणुकेचें तर हेंच पहिलें तत्व, कीं कोणाचेंहि चांगलें दिसलें,

कीं ओढ–बस्स गोष्ट नाहीं दुसरी ! स्त्रियांना विद्या–देणें चांगलें दिसल्याबरोबर केली कीं नाहीं सुरवात! पुनर्विवाह-चांगले दिसल्या बरोबर आणले कीं नाहीं अमलांत! स्त्रीस्वातंत्र्य–कसें थाटानें दिलें कीं नाहीं !

वि०–ओ माय् हार्ट्! डोळ्यांत नि कानांत तुळशीपत्रं काय तीं तुम्हीच घातलीं आहेत ! मिस्तर् सेक्रेटरि, गेल्या वड्या समारंभांत दांडक्याचें नि पाठीचें वर्णन आमच्या मिसेस् भालेरावणीनें केलें होतें तोच लोणकढा मासला आज या मिस्तर् वामनरावजीच्या करीं दृष्टीस पडणार होता–पण थोडक्यांत मी आलें त्यानं बिनसलं !

ए०–व्हॉट्–मिस्तर् वामनराव ?

वा०–तुह्मी एडिटर साहेब, बोलायला मात्र फ्री, पण कृतीला जसें कांहीं आमच्या गांवचेच नाहींत !–

फ०मु०–नान्सेन्स–असें बोलन आणि अशा कृती करून आमच्या नवीन सुरू केलेल्या सुधारणेला मात्र जबरदस्त शॉक तुम्ही आमचेच लोक असून बसिवणार !

प्रि०–[ चांगले बळ मिळाल्यावर. ] मला जर पुन्हां असा जाच होईल, तर मी यांच्या वरिष्टाकडे गाऱ्हाणें एकदम नेईन !

ए०–प्रिताईबाई तुम्ही मोठ्या विचारी बायको आहात ! आणि त्यामुळें वरिष्टाकडे गाऱ्हाणें नेण्याचा प्रकार करणार नाहीं !

फ०मु०–थ्यांक् यू मिस्तर् सेक्रेटरि फॉर् यूअर् ऍडव्हाइस्– त्याची कोण फजिती उडाली पाहिलीत ना! त्यामुळें आपल्या सर्वांनां खालींच माना कराव्या लागल्या! मिस्तर् सेक्रेटरि आणि वामनराव– स्त्री पुरुषांच्या, इन् अदर् वर्डस् नवरा बायकोच्या वागणुकीच्या संबंधानें आपल्याला स्पेशल् नियम करून अमलांत आणले पाहिजेत, आणि ते बरोबर रीतीनें पाळल्या बद्दल जे लोक आपापल्या बायका कडोन सरटिफिकिटस् कमिटी पुढे हजर करतील, त्यांना स्पेशल् आनर्स् देण्या बद्दल विचार करण्या करितां एक स्पेशल् कॉन्फरन्स् बोलावले पाहिजे!

ए०–नो युस् ऑफ् नौ लुझिंग् टाइम् हिअर्– आजची एक्स्ट्राआरडिनरि मिटिंग् आहे- त्या करितां सर्वांनीं आतां गेलेच पाहिजे ! (सर्व जातात.)

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु. ॥

# विक्रीस तयार.

| | कीं० आ० | पो० पै |
|---|---|---|
| फरडा मुत्सद्दी प्रहसन .... .... .... .... | ३ | ६ |
| फ्याशनेबल् वाईफ् अथवा विचारसन्निपातप्रहसन .... | ३ | ६ |
| पुनर्विवाहदुःखदर्शन प्रहसन .... .... .... | ३ | ६ |
| मोर एल्. एल्. बी. प्रहसन ( आवृत्ती २ री. ) .... | ३ | ६ |
| स्त्रीविद्यावैचित्र्यदर्शन प्रहसन ( आवृत्ती ३ री. ) .... | ३ | ६ |
| भाषासुंदरी—अथवा विष्णु कृष्ण चिपळुणकर, निबंधमालाकार, यांचें नाट्यावतरण. .... | ४ | ६ |
| अक्कलकोटच्या स्वामीमहाराजांचें चरित्र ( इतिहासरूपानें ) भाग १ ला. ( महाराजांची साधारण स्थिति आणि त्यांजविषयीं लोकांचे विचार. ) .... .... | ८ | ६ |
| अक्कलकोटच्या स्वामीमहाराजांचें चरित्र. भाग २ रा. ( इतिहासरूपानें. ) (अद्भुत चमत्कार.) | ८ | ६ |

## वरील पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

मुंबई—जगदीश्वर छापखाना—कांदेवाडी.
,, इंदुप्रकाश—नळबाजार रोड.
,, नेटिव्ह् ओपिनिअन—गिरगांवरोड.
,, विद्याप्रकाश छापखाना—बेलासिसरोड
पुणें—पुणेंवैभव—मेहुणपुरा.
,, ज्ञानप्रकाश—शुक्रवारपेठ.
,, ज्ञानचक्षु—बुधवारपेठ.
,, केसरी— ,,
हरदा—न्यायसुधा.
सोलापुर—सोलापूरवृत्त.

### मुंबई बुकसेलर्स

जनार्दन महादेव गुर्जर—रामवाडी रोड.
,, काशिनाथ वासुदेव खांडेकर. ,,
,, गोधळेकर. ,,
,, वा०शा०आणि कंपनी...नवीवाडी रोड.
एम. काणे आणि कं० काळका देवी रोड.
पुणें-नारोअप्पाजीगोडबोले—बुधवारपेठ.
,, किताबखाना पुणें ,,
कोल्हापूर--दामोदर चिंतामण भागवत.
नगर -रंगनाथ भगवंत निळस.-गुजर अळी.